cmyk

## संपादकीय

### अठरा पगड एक व्हावेत!

साताऱ्यातील ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने मराठी साहित्यविश्वात नवीन उत्साह निर्माण केला असला तरी, अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणातील एका विशिष्ट उल्लेखाने वैचारिक चर्चेला नवे वळण दिले आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५० | बुधवार दि.०७ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### १ फेब्रुवारीला रविवार मात्र अर्थसंकल्प सादर होणार

दिल्लीः केंद्रीय अर्थ संकल्प प्रत्येक वर्षी १ फेब्रुवारीला सादर केला जातो. यावेळी १ फेब्रुवारीला रविवार आला आहे. त्यामुळे या दिवशी अर्थ संकल्प सादर होणार की नाही याबाबत चर्चांना ऊत आला आहे. दरम्यान वृत्तानुसार केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण या रविवारी १ फेब्रुवारी २०२६ लाच केंद्रीय अर्थ संकल्प सादर करण्याची शक्यता आहे. संसदीय कार्य समितीच्या बुधवारी होणाऱ्या बैठकीत अर्थ संकल्पाच्या संसदीय सत्राच्या तारखेबाबत अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो. अधिकाऱ्यांनी सांगितले की, बैठकीत संसदेचे अर्थ संकल्पीय अधिवेशन आणि या वर्षी कोणत्या दिवशी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाईल, या दोन्हीची तारीख निश्चित केली जाईल. एक फेब्रुवारीला रविवार आल्यामुळे अनिश्चितता निर्माण झाली आहे.

### सोनिया गांधी यांची प्रकृती बिघडली

नवी दिल्लीः ज्येष्ठ काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी त्यांची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांचे एक पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. सोनिया गांधी यांच्या आरोग्याबाबत काँग्रेस पक्षाकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहीती देण्यात आलेली नाही. काँग्रेस नेत्या आणि राज्यसभा खासदार सोनिया गांधी गेल्या काही वर्षांपासून आरोग्यविषयक समस्यांनी त्रस्त आहेत. याच कारणामुळे त्या वेळोवेळी नियमित आरोग्य तपासणी आणि उपचारांसाठी रुग्णालयात जात असतात.

### ७ न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी

गांधीनगर/नवी दिल्ली : गुजरात, उत्तर प्रदेश आणि कर्नाटकात मंगळवारी वेगवेगळ्या ठिकाणी बॉम्बने उडवण्याच्या धमक्या मिळाल्या. गुजरातच्या सहा न्यायालयांना, उत्तर प्रदेशातील मऊ रेल्वे स्थानकावरील ट्रेनला आणि कर्नाटकातील म्हैसूर जिल्हा न्यायालयाला धमकी देण्यात आली. सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांनी आणि बॉम्ब शोधक पथकाने घटनास्थळी तपासणी केली, परंतु कोणत्याही न्यायालय किंवा ट्रेनमधून कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. त्याचबरोबर, केरळमधील कन्नूर जिल्ह्यात पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून १२ देशी स्फोटक उपकरणे जप्त केली आहेत. सर्व प्रकरणांची चौकशी सुरू आहे. आणंद, राजकोट, अहमदाबाद आणि भरूच येथील सत्र न्यायालयांना अशाच प्रकारचे ईमेल मिळाले. मात्र, बॉम्ब शोधक पथकाच्या तपासणीत न्यायालयात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

### उत्तर प्रदेशात २.८९ कोटी मतदारांची नावे वगळली

लखनऊः उत्तर प्रदेशात 'विशेष गहन पुनरीक्षण मोहिमे'नंतर (एसआयआर) निवडणूक आयोगाने मतदार यादीचा मसुदा अधिकृतपणे प्रसिद्ध केला आहे. या प्रक्रियेत राज्याच्या मतदार यादीतून तब्बल २.८९ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली असून, यात प्रामुख्याने मृत, स्थलांतरित आणि दुबार नोंदणी असलेल्या मतदारांचा समावेश आहे. आयोगाने सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन त्यांना या यादीची प्रत सोपवली असून, ही यादी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदार यादी पुनरीक्षणाची ही प्रक्रिया २७ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली होती. ४ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष गणना टप्प्याला सुरुवात झाली, ज्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात मतदार यादी 'फ्रीज' करण्यात आली होती.

# युरियासाठी शेतकऱ्यांची फरफट !

## विक्रेत्यांच्या मनमानीने शेतकरी हतबल तर सरकार प्रचारात व्यस्त

पुणे । प्रतिनिधी

**रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक असलेले युरिया खत मिळत नसल्याने शेतकरी अक्षरशः हतबल झाला आहे. राज्यात खत दुकानदारांकडून कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असून, "साठा नाही" असे सांगत जादा दराने खत विक्री केली जात आहे. विक्रेत्यांच्या मनमानीने शेतकरी एकीकडे हतबल झाला आह तर दुसरीकडे सरकार प्रचारात व्यस्त असल्याचे दिसत आहे.**

गत पावसाळ्यात समाधानकारक व अधिक पाऊस झाल्याने पाण्याची उपलब्धता मुबलक असून, यंदा रब्बीचा पेरा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे युरियाची मागणी स्वाभाविक आहे. मात्र, ऐन गरजेच्या वेळी खत न मिळाल्याने पिकांचे उत्पादन धोक्यात आले असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही मोजक्या दुकानांत युरिया उपलब्ध असला तरी प्रति पोते ३० ते ५० रुपयांची बेकायदेशीर आकारणी केली



जात आहे. इतकेच नव्हे तर अनेक ठिकाणी युरिया देण्यासाठी इतर खते जबरदस्तीने लिंकिंग करून खरेदीस भाग पाडले जात आहे, ही सरळसरळ लूट असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. विशेष म्हणजे, शेतकरी अडचणीत असताना कृषी विभाग, पुरवठा विभाग आणि जिल्हा प्रशासनाची भूमिका सकारात्मक असल्याचे दिसत आहे. खत साठ्यावर नियंत्रण, दर तपासणी आणि अचानक छापे या बाबी केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. दरम्यान, सध्या महानगरपालिका निवडणुकांचा प्रचार जोमात सुरू असून, सत्ताधारी नेते प्रचारात मग्न असताना शेतकऱ्यांच्या ▶▶ पान २ वर

# लिहिलेले पुसता येते, कोरलेले नाही...!

## विलासराव यांच्यावर बरळल्यानंतर रितेश देशमुखचे जोरदार प्रत्युत्तर

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना उपरती, व्यक्त केली दिलगिरी

लातूर । प्रतिनिधी

**भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरमध्ये कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल एक वक्तव्य केले होते. भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता लातूरमधून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील, यात शंका नाही, असे ते म्हणाले होते.ङ्गत्यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांकडून संताप व्यक्त केला जात होता. त्यावर विलासराव देशमुख यांचे पुत्र आणि अभिनेते रितेश देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रितेश यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक**



**व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये दोन वाक्यांत त्याने रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे.**

लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण हे भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी लातूरला गेले होते. त्यावेळी त्यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल हे वक्तव्य केले होते. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते म्हणाले, कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून लक्षात येतंय की लातूर शहरातून विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसल्या जातील, यात काही शंका नाही. त्यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेसमधून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. मेळावा संपल्यानंतर मात्र रवींद्र चव्हाण यांनी माध्यमांशी कोणताही संवाद साधला नव्हता. त्यांनी तिथून लगेच निघून जाणे पसंत केले होते. त्यांच्या वक्तव्यावर ▶▶ पान २ वर

# राहुल नार्वेकर अडचणीत?

## आठ उमेदवारांची उच्च न्यायालयात धाव

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी स्वीकारले नाहीत, असा आरोप करत आठ इच्छुक उमेदवारांनी मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. भाजप आमदार आणि महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आदेशावरून हे अर्ज फेटाळण्यात आल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होणार आहेत.



याचिकाकर्त्यांनी प्रभाग क्रमांक २२४ ते २२७ साठी आवश्यक कागदपत्रे आणि सुरक्षा ठेवीसह उमेदवारी अर्ज सादर केले होते. मात्र, नार्वेकर यांनी निवडणूक अधिकाऱ्यांवर हे अर्ज स्वीकारू नयेत असा दबाव टाकल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये दिवसाढवळ्या थरार

## कंत्राटी कर्मचाऱ्याची गोळ्या घालून हत्या

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून शांत असलेल्या बीड शहरात मंगळवारी दुपारी पुन्हा एकदा रक्ताचा सडा पडला. शहरातील अंकुश नगर भागात एका ३५ वर्षीय तरुणाची अज्ञात हल्लेखोरांनी अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. हल्लेखोर केवळ गोळीबार करूनच थांबले नाहीत तर त्याचा पाठलाग करून नंतर त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वर करून त्याचा खून



केला. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. मयत हा बीड नगर पालिकेत कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत होता. या हत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, हर्षद तुळशीराम शिंदे (वय ३५, रा. धानोरा रोड, हाउसिंग कॉलनी, बीड) हा तरुण बीड नगरपालिकेत प्लंबिंगचे काम करत होता. मंगळवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो अंकुश नगर येथील शिवाजीनगर ▶▶ पान २ वर

## दर्पणदिन



**बीडः दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात अभिवादन करताना ज्येष्ठ पत्रकार जगदीश पिंगळे, प्रमोद कुलकर्णी ,अभिमन्यू घरत, संजय मालानी, मंगेश निटुरकर, रवी उबाळे, संजय हंगे ,अनिल अष्टपुत्रे ,विशाल साळुंखे व कार्यकारी संपादक सुभाष चौरे, अनिल जाधव, दिलीप शिंगाडे आदी.**

# बांग्लादेशात हिंदू विधवेवर सामूहिक बलात्कार

ढाका । वृत्तसंस्था

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराच्या घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. गेल्या तीन आठवड्यांत सहा हिंदूंची हत्या करण्यात आली आहे. धर्मांध झालेले बांगलादेशी विकृत एवढ्यावरच थांबलेले नाहीत. एका हिंदू विधवेला क्रूरतेचा बळी बनवण्यात आले आहे.

नराधमांनी पीडित महिलेवर सामूहिक बलात्कार केला. तसेच तिचे केस कापून तिला विवस्त्र अवस्थेत झाडाला बांधून मारहाण केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे स्थानिक हिंदू समाजात भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे. काही समाजकंटकांनी पीडित महिलेच्या ▶▶ पान २ वर

# शिंदेसेनेला बाजूला ठेवून भाजपची काँग्रेससोबत युती

## अंबरनाथ नगरपरिषदेत सर्वात मोठी राजकीय घडामोड

ठाणे । प्रतिनिधी

**ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथमधून एक महत्वाची राजकीय बातमी समोर येत आहे. अंबरनाथ नगरपरिषदेत शिवसेना शिंदे गटाला भाजपने धक्का दिला आहे. शिंदे गटाला बाजूला ठेवत भाजप आणि काँग्रेस अंबरनाथ नगरपरिषदेत एकत्र आल्याने खळबळ उडाली आहे.**


काँग्रेसच्या जोरावर भाजपा अंबरनाथ परिषदेत बहुमतात येणार



आहे. तर यावर शिवसेना शिंदे गटाने देखील प्रत्युत्तर दिले आहे. ही अभद्र युती असल्याची टीका शिवसेनेने केली आहे. ही युती शिंदे गटाच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. काँग्रेसमुक्त देश करणार असल्याची घोषणा भाजप पक्षाने केली होती, मात्र आता भाजपा पक्ष काँग्रेसला सोबत घेऊन अंबरनाथ नगरपरिषदेत बहुमतात येणार आहे. भाजपच्या तेजश्री करंजुले या नगराध्यक्ष म्हणून विजयी झाल्या आहेत. असे असताना भाजपचे १६, काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ४ अशा एकूण ३२ नगरसेवकांची मोट बांधून भाजप बहुमत मिळवणार ▶▶ पान २ वर


# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी खा.कलमाडी यांचे निधन

पुणे । प्रतिनिधी



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे मंगळवारी पहाटे निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून सुरेश कलमाडी हे आजाराने ग्रस्त होते. त्यातूनच कलमाडी यांची प्राणज्योत ६ डिसेंबर रोजी मंगळवारी पहाटे साडेतीन वाजता मालवली. त्यांच्यावर दुपारी अन्त्यसंस्कार करण्यात आले.

सुरेश कलमाडी यांचा जन्म १ मे १९४४ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट व्हिन्सेंट हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी १९६० मध्ये नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५०.०० क्विंटल | २,३०० | ३,००१ | २,६२८ |
| ज्वारी/हायब्रिड : २८.५० क्विंटल | १,८५० | ३,७०० | ३,२२१ |
| मका/लोकलः ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १००.५० क्विंटल | ४,७५० | ७,१०० | ६,७८१ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ६,१०१ | ६,२०० | ६,१५० |
| बाजरीः ४७.५० क्विंटल | २,१०० | ३,१४२ | २,८१० |
| मुगः १.०० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीनः ५९८.५० क्विंटल | ४,०५० | ४,८५० | ४,७४४ |
| हरभराः १.५० क्विंटल | ४,००० | ५,५०० | ४,५३३ |

# भरती घोटाळा; एसआयटी चौकशी सुरु असताना शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणार पगार

मुंबई– बीड । प्रतिनिधी

**राज्यातील नाशिक नागपूर पुणे लातूर बीड जिल्ह्यात शिक्षक शिक्षकेत्तर भरतीत घोटाळा घाल्याने याची एसआयटी चौकशी लावण्यात आली. त्या दरम्यान अनेक कर्मचाऱ्यांचे पगार रखडले होते ज्यांचा दोष नाही त्यांनाही शिक्षा होत असल्याने, शिक्षकांच्या पगारपत्रकावर पुढील दोन दिवसांत सह्या करण्याचा निर्णय शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे शिक्षक, शिक्षकेतरांच्या रखडलेल्या पगाराचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. बीड जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक असे दोन्ही शिक्षणाधिकारी यापूर्वीच निलंबित करण्यात आले होते.**

गतवर्षापासून राज्यभरात बोगस मान्यता व बोगस शालार्थ आयडीबाबत एसआयटी मार्फत तपासणी सुरू आहे. या तपासणीमध्ये अनेक गैरप्रकार



उघडकीस येत असल्यामुळे अजूनही काही महिने ही तपासणी सुरू राहणार आहे. या प्रकरणी अनेक अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली असून, अनेकजण निलंबित आहेत. या प्रकारांच्या तपासणीदरम्यान पगारपत्रकावर सह्या केल्यामुळे काही अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली होती. कोणतीही शहानिशा न करता निरपराध अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात असल्याचे अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाचे म्हणणे होते. पगारपत्रकावर सही केल्यामुळे कारवाई होत ▶▶ पान २ वर

### लवकरच होणार बैठक

या प्रकाराची तीव्रता, तसेच राज्यभरातील लाखो शिक्षक–शिक्षकेतरांचे नुकसान लक्षात घेत अखेर अधिकाऱ्यांनी पगारपत्रकांवर सह्या करण्याचा निर्णय घेल्याने पुढील दोन दिवसांत या सह्या झाल्यानंतर शिक्षकांच्या खात्यावर पगार जमा होणार आहे. महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाला राज्य सरकारने बैठकीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच ही बैठकदेखील होणार असल्याची माहिती या अधिकाऱ्यांनी दिली.

cmyk

## अग्रलेख

# अठरा पगड एक व्हावेत!

साताऱ्यातील ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने मराठी साहित्यविश्वात नवीन उत्साह निर्माण केला असला तरी, अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणातील एका विशिष्ट उल्लेखाने वैचारिक चर्चेला नवे वळण दिले आहे. अध्यक्षीय भाषणाच्या सुरुवातीला पाटील आणि कुलकर्णी यांच्या एकीकरणाबद्दल केलेले विधान हे संमेलनाच्या शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या मराठी साहित्याच्या वैचारिक दिशेला प्रश्नचिन्ह उभे करणारे ठरले. अध्यक्ष विश्वास पाटील यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच पाटील आणि कुलकर्णी यांच्या एकीकरणाचा उल्लेख करून ''एका गावाला सुधारायचे असेल तर पाटील आणि कुलकर्णी एकत्र येणे आवश्यक'' असे म्हटले. हे विधान विनोदी स्वरूपात असले तरी, ते महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या संदर्भात अतिशय संवेदनशील आहे.

महाराष्ट्र उभा राहिला तो इथल्या सर्वजातीय तसेच १८ पगड जातीतील आणि अलूतेदार, बलुतेदार, सर्वसामान्यांच्या कष्टातून, त्यागातून. शिवरायांच्या स्वराज्याने समाजास जसे एकसंघ बनवले, तसेच वैचारिक मशागत केली ती इथल्या सर्व संतांच्या शिकवणुकीने. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखोबा, सावता माळी, जनाबाई, बहिणाबाई अशा संतांनी. ही सर्व जातींच्या एकीची आणि वैचारिकतेची फळे आहेत की महाराष्ट्र हा नेहमीच प्रागतिक विचारांचा राहिला आहे. अशा काळात जेव्हा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष 'पाटील आणि कुलकर्णी' यांच्या एकीचे गुणगान करतात, तेव्हा शंभरीला पोहोचलेल्या या संमेलनाचे उद्याचे एखादे अध्यक्ष वर्णव्यवस्थेचे समर्थन करताना दिसले तर आश्चर्य वाटू नये. ज्यांना 'पानिपत'सारखी कालजयी कादंबरी लिहिण्याचे धैर्य आहे, त्यांनी अशा पांगेऱ्यात गुंतणे योग्य नव्हते. पाटील यांच्या या विधानातून त्यांच्या पाटीलकीला राजेशाहीची चकाकी अद्याप लोकशाहीच्या पूर्ण अर्थाने आत्मसात झालेली नाही, हेच दिसून येते. विद्रोही आणि अन्य चळवळी उभ्या राहतात त्या अशा विचारांच्या आणि मानसिकतेच्या तिटकाऱ्यामुळेच. नाहीतर त्या मराठी नावाच्या एका सशक्त रथाच्या दोन चाकांप्रमाणे धावल्या असत्या. आवश्यक तेथे त्यांनी एकसारखी वळणे घेतली असती आणि मराठी समाजाने एक गती कायम राखली असती. आज साहित्याच्या या दोन प्रवाहांना आलेले साचलेपण केवळ आणि केवळ त्यांच्यातील प्रवाही विचारांना मारल्याचे प्रतीक आहे. कोणालाही कोणाचे मोठेपण मान्य नाही आणि कोणाला वास्तवाशी भिडून दुसऱ्याच्या विचारांना समजून घ्यायचे नाही. म्हणूनच जेव्हा कधी मध्ययुगाचा विचार मांडला जातो तेव्हा त्या काळातील साहित्य आजही लोकांच्या ओठावर का आहे? त्याची अभंगवाणी का बनली आहे याचा विचार व्हायला हवा. खऱ्याखुऱ्या मराठी साहित्याचा कणा हा महाराष्ट्रातील संतांच्या विचारांवर घडला आहे. तो कोणाची नक्कल नाही की अनुवादही नाही. त्यामुळे त्याच विचारांवर इथला समाज बांधला गेला. आज या समाजाची जी विस्कळीत अवस्था झाली आहे, त्याला पुन्हा एकत्र बांधायचे असेल तर पाटील-कुलकर्णीचे गुणगान नव्हे, तर सर्व जातीय कर्तृत्वानांचे जयगान करणे आवश्यक आहे. साहित्य संमेलनाने ही चूक सुधारावी. साताऱ्याचे हे चौथे संमेलन (१९०५, १९६२, १९९३ नंतर) असले तरी यंदाचे संमेलन विशेष होते. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे संमेलनात भाषेच्या संवर्धनासाठी नव्या संकल्पना चर्चिल्या गेल्या. पण सातारा म्हणजे फक्त कंदी पेढे नाहीत. या कंदींचे नाव जगाला माहीत असले तरी सातारा परिसरातल्या दरी-डोंगरातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी पशुपालन करून निर्माण केलेल्या अतिरिक्त दुधातून जो चविष्ट पेढा तयार झाला, तो या मातीची खासियत आहे.

पाटलांनी कंदी पेढा रिचवला खरा, पण त्यांच्याप्रमाणेच दऱ्या-डोंगरातून येणाऱ्या सर्वसामान्य, सर्व जातीय शेतकऱ्यांना त्यांनी तितका मान दिला असे वाटले नाही. त्या मागचे श्रम आणि पूर्वपिठिका विसरता येत नाही. वे९९ संमेलन हे शतकाच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या मराठी साहित्याचे आत्मपरीक्षण आणि नव्या दिशेची सुरुवात ठरू शकते. त्यामुळे मतभेद असले तरी विश्वास पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेले हे संमेलन यशस्वी झाले याचे श्रेय आयोजक महाराष्ट्र साहित्य परिषद शाहुपुरी शाखा, मावळा फौंडेशन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या टीमला जाते. साहित्य ही समाजाची कास आहे. ती मजबूत राहिली तर समाज मजबूत राहील.

साताऱ्यातील हे संमेलन तेच सांगून गेले. स्वराज्याची राजधानी असलेल्या या ऐतिहासिक नगरीत १ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत शाहू स्टेडियममध्ये पार पडलेले हे संमेलन केवळ साहित्यिक मेळावाच नव्हे, तर मराठी भाषा, संस्कृती आणि सामाजिक अस्मितेच्या पुर्नजागरणाचे भव्य प्रतीक ठरले.

# समाज घटकातील कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी राष्ट्रवादी स्वबळावर-आ. विक्रम काळे

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा) पक्षाला नाईलाजास्तव आणि सर्व समाज घटकातील कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी महायुतीतुन बाहेर पडावे लागले, म्हणुन पक्षाचा अपमान करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले आहे.**

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा) व मनसे युतिचा निवडणूक प्रचाराचा शुभारंभ सोमवार कुलस्वामीनी मंगल कार्यालय जिल्हा पक्ष कार्यालय जालना येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी श्री. काळे हे बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष आमदार अरविंदराव चव्हाण हे होते. या प्रसंगी अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. नासेर काझी प्रदेशउपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, शहर जिल्हाअध्यक्ष शेख महेमूद, महिला प्रदेश सरचिटणीस शंकुतलाताई कदम, युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशिल चव्हाण, भाऊसाहेब गोरे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा अध्यक्ष शहाआलम खान महिला जिल्हा अध्यक्ष मंगलताई पाटील, शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, प्रा. सोपानराव तेलगड, अण्णासाहेब चितेकर, प्रभाकर घेवंदे, सतिश वाहुळे, आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना श्री. काळे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिवशाहुफुले आंबेडकर धर्मनिरपेक्ष विचारावर चालणारा पक्ष आहे. ही बाब पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी वारंवार राज्याच्या जनतेसमोर मांडलेली आहे. जालना शहराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आणि विशेष करुन शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न, स्वच्छता, आदी प्रश्नावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल असे श्री. काळे म्हणाले. अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड नासेर काझी बोलतांना म्हणाले की, जालना नगरपालिकेत सत्तेत असलेल्या लोकांनी या शहराचा विद्रुप चेहरा केलेला



आहे. नागरिकांना सध्या नागरी सुविधा उपलब्ध होत नाही ही दुर्दैवी बाब आहे. अनेक वर्षांपासुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जसाचा तसा आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार निश्चितपणे या शहराकडे विकासात्मक दृष्टीने पाहतील यात शंका नाही. म्हणुन मतदाराने राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे युतीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन श्री. काझी यांनी केले. जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण म्हणाले की, निवडणुकीच्या सुरुवातीपासुनच आम्ही महायुती म्हणुन निवडणूक रिंगणामध्ये उतरणार होतो. परंतु आम्हाला शेवटपर्यंत अंधारात ठेवण्यात आले. भाजप हा पक्ष कधी विश्वासघात करेल हे सांगणे फार कठीण असल्याचे त्यांनी सांगुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मनसे युती या निवडणुकीत आपली ताकद दाखवुन देईल. उमेदवार आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्ण ताकदीने या निवडणुकीत झोकुन द्यावे असे आवाहन श्री. चव्हाण यांनी यावेळी केले. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष व जिल्हा समन्वयक मधुकरराव आर्दड म्हणाले की, जालना शहर हे उद्योगाचे केंद्र आहे येथील स्टिल कंपन्याचे नाव राज्यभर नावाजलेले आहे. तर बी-बियाणे उद्योग हा संपुर्ण देशात नावाजलेला असतांना या शहराची झालेली दुर्वस्था पहावत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महानगरपालिकेच्या सत्तेत मोठा वाटा मिळाल्यास निश्चितपणे विकास आराखडा आणि स्वच्छ सुंदर शहर करण्यासाठी आपला मानस आहे असे त्यांनी सांगितले. श्री आर्दड हे जालना नगर परिषदेचे मुख्य अधिकारी राहिल्याने आणि मराठवाडा विभागाच्या आयुक्त पदावर कार्यक्षमपणे काम केल्यामुळे जिल्ह्याची त्यांना संपुर्ण माहिती आहे. यावेळी मनसेचे जिल्हा अध्यक्ष रवि राऊत, शकुंतलाताई कदम, धैर्यशिल चव्हाण, शहाआलम खान, भाऊसाहेब गोरे, अण्णासाहेब चितेकर, भगवान कावळे आदीने आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जालना शहर जिल्हा अध्यक्ष शेख महेमुद यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसे युती उमेदवारांच्या प्रचाराच्या शुभारंभनारळ फोडुन शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी संपुर्ण शहरातुन उमेदवार आणि कार्यकर्ते वाजत-गाजत कार्यक्रमास्थळी पोहचले होते. यावेळी रिंकलताई तायड, शितलताई बारोटे, बबन गाडे, शिवराज जाधव, प्रविण शिंदे, संतोष ढेंगळे, जहीर बिल्डर, सिताराम तुपे, जावेद अली युतीचे सर्व उमेदवार पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे संचालन शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग यांनी केले. संतोष ढंगळे यांनी उपस्थितीचे आभार मानले.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**जालना : आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी जेष्ठ पत्रकार, संपादक, प्रतिनिधी यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. (छाया : शिवाजी मस्के जि.प्र.जालना)**

# शिवराज विद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**परतूर । प्रतिनिधी**

**शिवराज महाविद्यालय परतूर येथे ४ जानेवारी एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र सहकार्याने अत्यंत उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात यशस्वीपणे पार पडले.**

या राष्ट्रीय चर्चा सत्रासाठी देशातील नामवंत वैज्ञानिक, संशोधक व शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. पराग नेमाडे ( मुंबई), डॉ. मनोज जाधव ( जालना), डॉ. हेमंत चांडक ( अध्यक्ष, अमरावती), डॉ. सुनील पवार (डॉ. रेड्डीज लॅब, हैदराबाद) आणि डॉ. नागप्पन रामास्वामी ( मुंबई) यांचा प्रामुख्याने समावेश होता. या तज्ज्ञांनी विश्लेषणात्मक विज्ञानातील अद्ययावत तंत्रज्ञान,




आंतरशाखीय संशोधन महत्व ,शाश्वत विकासासाठी वैज्ञानिक नवोन्मेष तसेच उद्योग व शिक्षण क्षेत्रातील परस्पर सहकार्य यावर सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. चर्चा सत्राच्या उद्घाटन समारंभास डॉ. भगवानसिंग डोभाळ, अध्यक्ष, शिवराज महाविद्यालय, परतूर हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संशोधनप्रधान शिक्षणाची गरज, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्याचे महत्त्व तसेच अशा राष्ट्रीय चर्चा सत्रांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळते, असे प्रतिपादन केले. या प्रसंगी प्रा. डॉ. मझहर फारुकी (सचिव, ), प्रा. डॉ. सी. एस. पाटील (अध्यक्ष, ), प्रा. डॉ. भारत खंडारे (व्यवस्थापन परिषद सदस्य), प्रा. डॉ. राजेंद्र परदेशी व प्रा. डॉ. गणेश अग्निहोत्री (शैक्षणिक परिषद सदस्य) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच एर. खुशवंतसिंग डोभाळ, डॉ. संगीता डोभाळ व गणेश डोभाळ डॉ. डी. डी. कायन्दे, डॉ. प्रशांत नेतनकर सर, डॉ. डी. टी. साखरे, डॉ. अनिल किरदंत यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली या राष्ट्रीय चर्चा सत्रात देशभरातून ६५० पेक्षा अधिक प्राध्यापक, संशोधक व संशोधन विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध तांत्रिक सत्रे, चर्चासत्रे व मार्गदर्शन सत्रांमधून सहभागी प्रतिनिधींना संशोधनाच्या नव्या दिशा मिळाल्या. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवोन्मेषाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी हे चर्चा सत्र अत्यंत उपयुक्त ठरले, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी शिवराज महाविद्यालय, परतूर व यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशाबद्दल विविध स्तरांतून आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले.

# पान १ वरून...

### युरियासाठी शेतकऱ्यांची फरफट!

प्रश्नांकडे साफ दुर्लक्ष केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. ''मतांसाठी शेतकरी, निवडणुकीनंतर उपेक्षा'' हीच पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या नशिबी आली असल्याची भावना तीव्र होत आहे. जर तात्काळ युरिया पुरवठा सुरळीत केला नाही, दरवाढ व लिंकिंगवर कारवाई केली नाही, तर शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार, असा इशाराही दिला जात आहे.

-------------

### राहुल नार्वेकर अडचणीत?

आहे. हे सर्व प्रभाग दक्षिण मुंबईतील कुलाबा विधानसभा मतदारसंघात येतात. नार्वेकर यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा आणि राजकीय अधिकाराचा गैरवापर करून मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केला, तसेच पोलिस यंत्रणेमार्फत उमेदवारांना रिटर्निंग अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून बाहेर काढण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याचा दावाही याचिकेत करण्यात आला आहे. मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर ही याचिका दाखल करण्यात आली असून, योग्य वेळी सुनावणी घेतली जाईल, असे न्यायालयाने सांगितले. दरम्यान, नार्वेकर यांचे भाऊ मकरंद नार्वेकर, बहीण गौरी शिवलकर आणि मेहुणी हर्षिता शिवलकर हे अनुक्रमे प्रभाग क्रमांक २२५, २२६ आणि २२७ मधून निवडणूक लढवत आहेत. विरोधी पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन, नामांकन प्रक्रियेत हस्तक्षेप आणि सीसीटीव्ही फुटेजमध्ये छेडछाड झाल्याचे आरोप केले असून, नार्वेकर यांनी हे आरोप फेटाळले आहेत.

-----------

### लिहिलेले पुसता येते,

रितेश देशमुख यांनी म्हटले आहे की, लोकांसाठी जगलेल्या माणसांची नावे मनावर कोरलेली असतात. लिहिलेलं पुसता येतं, कोरलेलं नाही, असड त्यांनी हात जोडून म्हटले आहे. महाराष्ट्राच्या मनामनात साहेब.. असे कॅप्शन देत त्यांनी हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. रितेश यांच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. या सगळ्या प्रकरणावर आणि रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या विलासराव यांच्यावरील टीकेला उत्तर देताना लातूरच नाही तर संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. काँग्रेस आणि मित्र पक्षांनी यावर जोरदार आक्षेप घेतला आहे आणि रवींद्र चव्हाण यांना टार्गेट केले आहे. विलासराव देशमुख यांचे नेतृत्व मोठे होते आणि ते लोकांच्या कायम स्मरणात आहेत, यामुळे त्यांना पुसण्याची भाषा चव्हाण आणि भाजपने करू नये अशा संतप्त प्रतिक्रिया नुसत्या काँग्रेस कडूनच नाही तर मराठवाड्यातील सर्व पक्षातील नेत्यांमधून उमटत आहेत.

-----------

### बांग्लादेशात हिंदू विधवेवर

घरात घुसून तिचे अपहरण केले. आरोपींनी तिच्यावर अत्याचार केला. पीडितेने प्रतिकार केला असता तिला बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींचे क्रौर्य एवढ्यावरच थांबले नाही; त्यांनी महिलेचे केस कापले आणि तिला एका झाडाला बांधून पळ काढला. पहाटे काही ग्रामस्थांना ही महिला त्या अवस्थेत दिसल्यानंतर या घटनेचा उलगडा झाला. पीडित महिलेने हिंमत दाखवत सोमवारी दुपारी कालीगंज पोलीस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध रितसर तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत एका संशयित आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव हसन (४५ वर्ष) असल्याचे समोर आले आहे. हसन हा पीडितेच्या परिसरातीलच एका गावातील रहिवासी असून तो या गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभागी असल्याचा संशय आहे. उर्वरित तीन आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी ठिकठिकाणी छापे टाकले आहेत. पीडितेचे दोन पुरुष नातेवाईक तिला भेटायला आले होते. हीच संधी साधून शाहीन आणि हसन घरात घुसले. त्यांनी नातेवाईकांना एका खोलीत कोंडून ठेवले. नराधमांनी महिलेला दुस-या खोलीत नेले आणि तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. बांगलादेशात सत्तापालट झाल्यापासून हिंदू मंदिरे, घरे आणि महिलांना लक्ष्य केले जात असल्याच्या तक्रारी वारंवार येत आहेत. मानवाधिकार संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध केला असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. स्थानिक पोलिसांनी या प्रकरणी काही संशयितांना ताब्यात घेतले असल्याचे सांगितले जात आहे, मात्र अद्याप मुख्य आरोपी मोकाट आहेत.

-----------

### बीडमध्ये दिवसाढवळ्या

रोडवर आपल्या कामात व्यस्त होता. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी सुरुवातीला हर्षदवर दोन गोळ्या झाडल्या. गोळीबाराच्या आवाजाने परिसरात एकच धावपळ उडाली. जखमी अवस्थेत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी हर्षद जवळच असलेल्या एका पत्र्याच्या शेडच्या मागे धावत गेला. मात्र, हल्लेखोराने त्याचा पाठलाग सोडला नाही. त्या ठिकाणी त्याला गाठून हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्याच्यावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात हर्षद जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून बीडचे अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, आणि पोलीस निरीक्षक बांगर यांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. ही हत्या करण्यामागे याच भागातील सूर्यवंशी नामक तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. हर्षद शिंदे याच्या हत्यामागे नेमका काय उद्देश होता, हे रात्री उशिरापर्यंत स्पष्ट होऊ शकलेले नाही. जुन्या वादातून ही हत्या झाली की यामागे काही वेगळे आर्थिक किंवा वैयक्तिक कारण आहे की नगरपालिकेचे काम करण्यावरून ही हत्या झाली याचा तपास पोलीस करत आहेत. दिवसाढवळ्या वर्दळीच्या ठिकाणी अशा प्रकारे गोळीबार आणि हत्या झाल्याने बीडमधील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

--------------

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी

प्रवेश घेतला. १९६४ ते १९७२ या काळात त्यांनी भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा बजावली. त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. १९७७ मध्ये कलमाडी यांनी पुणे युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून राजकीय प्रवासाला सुरुवात केली. ते पुण्यातून तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. तसेच त्यांनी चार वेळा राज्यसभा सदस्य म्हणूनही काम केले. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये ते रेल्वे राज्यमंत्री होते. रेल्वे अर्थसंकल्प सादर करणारे ते पहिले राज्यमंत्री ठरले होते. ते १९९६ ते २०१२ या प्रदीर्घ काळासाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष होते. त्यांनी एशियन ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष आणि भारतीय ॲथलेटिक्स महासंघाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले. पुण्यात दरवर्षी होणारी 'पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन' आणि 'पुणे फेस्टिव्हल' सुरू करण्याचे श्रेय कलमाडी यांना जाते. २०१० मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या आयोजनात भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपावरून कलमाडी यांना २०११ मध्ये अटक करण्यात आली होती आणि काही काळ तुरुंगवासही झाला होता. तब्बल १५ वर्षांनंतर, २०२५ मध्ये अंमलबजावणी संचालनालयाने या प्रकरणी त्यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे नसल्याचे सांगत न्यायालयात क्लोजर रिपोर्ट सादर केला. न्यायालयाने तो मान्य केल्याने कलमाडी यांना या सर्व आरोपांतून क्लीन चिट मिळाली. गेल्या काही वर्षांपासून कलमाडी हे सक्रिय राजकारणापासून दूर होते. अलीकडेच प्रकृती बिघडल्याने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. परंतु, मंगळवारी पहाटे ३.३० च्या सुमारास कलमाडी यांचे निधन झाले.

-------------

### शिंदेसेनेला बाजूला ठेवून भाजपची

आहे. दरम्यान शिंदे गटाने ही तर अभद्र युती असल्याचा टोला भाजपाला लगावला आहे. ही युती शिवसेना शिंदे गटाच्या जिव्हारी लागली आहे. एकीकडे काँग्रेसमुक्त भारत करणाऱ्या भाजपाने काँग्रेसची हात मिळवणी करत शिवसेनेचा घात केल्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार बालाजी किणीकर यांनी म्हटले आहे. यावर भाजपाने उत्तर दिले आहे की, गेल्या पंचवीस वर्षापासून भ्रष्टाचार केलेल्या शिंदे गटाला सोबत घेऊन जर सत्तेत बसलो असतो तर ती अभद्र युती झाली असती. असे भाजपा उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले पाटील यांनी म्हटले आहे. आम्ही अंबरनाथ नगर परिषदेसाठी शिवसेना शिंदे गटासोबत महायुती संदर्भात अनेकदा बोलणी करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्या नेत्यांनी प्रतिसाद दिला नाही, असे देखील पाटील यांनी म्हटले आहे.

**२३ जागांवर विजय मिळवूनही शिंदे गट सत्तेपासून दूर**

अंबरनाथ नगरपरिषदेसाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. याठिकाणी शिवसेना शिंदे गटाकडून मनिषा वाळेकर आणि भाजपकडून तेजश्री करंजुले पाटील यांच्यामध्ये नगराध्यक्षपदासाठी चुरशीची लढत झाली. या निवडणुकीत भाजपच्या तेजश्री करंजुले या विजयी झाल्या होत्या. या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष भाजपाचा झाला असला तरी देखील याठिकाणी सर्वाधिक नगरसेवकपदाचे उमेदवार शिवसेनेचे विजयी झाले आहेत. नगराध्यक्षपद आणि नगरसेवकांच्या ५९ जागांसाठी याठिकाणी निवडणूक पार पडली होती. शिवसेना शिंदे गटाने २३ जागांवर विजय मिळवूनही त्यांना सत्तेपासून दूर रहावे लागत आहे.

-------------

### भरती घोटाळा; एसआयटी चौकशी सुरु असताना

असेल, तर आम्ही सहीच करणार नाही, असा निर्णय या संघटनेने घेतला होता. डिसेंबर महिन्यात यवतमाळ येथील एका अधिकाऱ्याला याच कारणावरून अटक केल्याने अधिकाऱ्यांनी सह्यांवर बहिष्कार टाकला होता. एसआयटीच्या आदेशावरून पगारपत्रकांवर सह्या करीत नसल्याचे कारण यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी पुढे केले होते. परंतु, शिक्षक-शिक्षकेतर संघटनांनी या प्रकाराला तीव्र विरोध करीत अधिकाऱ्यांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. या पद्धतीने शिक्षकांना त्रास दिला जात असेल, तर सर्व शिक्षक-शिक्षकेतर संघटना अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसू देणार नाहीत, असा इशाराही संघटनांमार्फत देण्यात आला होता. अनेक ठिकाणी राज्यातील खासगी संस्थांची एसआयटी मार्फत चौकशी सुरु असून, तेथील शिक्षणाधिकारी यांना पूर्व सूचनेशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही, अश्या सूचना आहेत. यात बीड जिल्ह्यातील दोन्ही शिक्षणाधिकारी निलंबित करण्यात आले आहेत.

-------------

# कवडगाव येथील प्रकाश काशिनाथ राऊत यांचे हृदयविकाराने निधन

**कवडगाव । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी प्रकाश काशिनाथ राऊत यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधना समय त्यांचे वय ५२ वर्ष होते.**



वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी प्रकाश काशिनाथ राऊत यांना शुक्रवार दि. २ जानेवारी रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यानंतर तातडीने त्यांना बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक झाल्याने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. स्वभावाने शांत, संयमी व हसतमुख असलेल्या प्रकाश राऊत यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर आज बुधवार दि. ७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता कवडगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई, दोन भाऊ, भाऊजी, पुतणे असा मोठा परिवार आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ०७ जानेवारी २०२६



## थोडक्यात

### शेतकऱ्यांसाठी कृषी माहिती देण्यासाठी 'किसान कॉल सेंटर' सेवा प्रभावी

बीड । प्रतिनिधी

कृषी क्षेत्रातील अद्ययावत माहिती शेतकऱ्यांपर्यंत जलद व प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने किसान कॉल सेंटर ही योजना राबविण्यात येत आहे. २१ जानेवारी २००४ रोजी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्यांच्या स्थानिक भाषेत तात्काळ उत्तरे देणे हा आहे.या सेवेअंतर्गत कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन, फलोत्पादन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, जलसंधारण, कृषी अभियांत्रिकी, कृषी विपणन, जैवतंत्रज्ञान आदी विषयांवरील माहिती शेतकऱ्यांना दिली जाते. किसान कॉल सेंटरचे व्यवस्थापन सेवा प्रदात्यांमार्फत करण्यात येत असून इन्फो किसान संचार लिमिटेड (आयएफएससी) यामार्फत ही सेवा पुरविण्यात येते.सध्या या केंद्रामध्ये १८०० पेक्षा अधिक टेली सल्लागार कार्यरत असून, ही सेवा सकाळी ६.०० ते रात्री १०.०० या वेळेत उपलब्ध आहे. शेतकरी टोल-फ्री क्रमांक १८००-१८०-१५५१ वर संपर्क साधून आवश्यक माहिती मिळवू शकतात. आवश्यकतेनुसार एसएमएस अलर्ट, कॉल रेकॉर्डिंग तसेच वेबसाइटद्वारेही माहिती देण्यात येते.महाराष्ट्रातील किसान कॉल सेंटर सेवा कार्यालय पुणे येथे कार्यरत आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी केले आहे.



### श्री सिद्धेश्वर विद्यालयात दर्पण दिन साजरा

माजलगाव- येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, विभाग प्रमुख कमलाकर झोडगे सर, पर्यवेक्षक परमेश्वर आदमाने सर, अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीमती अंजली वाघमारे, प्रसिध्दी प्रमुख शिवशंकर भंडारे, मंगेश मुळी इत्यादी उपस्थित होते. यावेळी शिवशंकर भंडारे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली.

### बांगरवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन दिनांक ७ जानेवारी २०२६ ते १३ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले अशी माहिती मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी दिली या शिबिराचे उद्घाटक म्हणून हरिभक्त पारायण लक्ष्मण महाराज सस्ते व गावातील नागरिक पत्रकार विजय जाधव गावातील समाजसेवक यांच्या हस्ते केले जाणार आहे तरी महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी व गावकरी यांनी या शिबिरात सहभाग घ्यावा या शिबिरात विविध कार्यक्रमाची आयोजन करण्यात आली आहे जल व्यवस्थापन वृक्षारोपण स्वच्छता अभियान राष्ट्रीय एकात्मता संविधानाचा अमृत महोत्सव बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान आरोग्य शिबिर पशुवैद्यकीय तपासणी शिबिर आदी कार्यक्रमाचे व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले तरी या शिबिरात सर्वांनी सहभागी व्हावे अशे आव्हान महाविद्यालयाची प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांनी केले आहे हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सभापती डॉ सुनील जाधव हनुमंत काळे ईश्वर काळे दत्ता काळे कार्यक्रम अधिकारी डॉ लोखंडे बी बी व प्राध्यापक बापू घोक्षे शिबिराचे नियोजन करीत आहेत.

# पाटोदा नगरपंचायतीचा अजब कारभार

## ६७ लाखांची 'ती' अग्निशामक गाडी ठरतेय भ्रष्टाचाराचे कुरण!

**पाटोदा । प्रतिनिधी**

**येथील नगरपंचायतीच्या अग्निशामक दलाचा कारभार सध्या चांगलाच चर्चेत आला असून, जनसामान्यातून संताप व्यक्त केला जात आहे. तब्बल ६७ लाख रुपये खर्चून खरेदी केलेली अग्निशामक गाडी शहरात लागलेली एकही आग विझवू शकली नाही, मात्र या गाडीच्या दुरुस्तीवर आणि देखभालीवर लाखो रुपयांची उधळपट्टी सुरू असल्याने ही गाडी म्हणजे भ्रष्टाचाराचे 'कुरण' ठरत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.**

नेमका प्रकार काय?

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपंचायतीने ६७ लाख रुपये खर्च करून ही अत्याधुनिक अग्निशामक गाडी खरेदी केली होती. मात्र, खरेदी केल्यापासून एकदा-दोनदा दुरुस्तीचे नाव सांगून ही गाडी केवळ उभीच आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आजवर शहरात किंवा परिसरात लागलेल्या आगीच्या घटनांमध्ये या गाडीचा उपयोग शून्य राहिला आहे. कधी गाडीत डिझेल नसते, तर कधी पाण्याची टाकी भरलेली नसते. गाडीत दोन लिटर डिझेलही नसते, अशी धक्कादायक माहिती समोर येत आहे.

वापराशिवाय १० लाखांचे नवे टेंडर!

जी गाडी वर्षभर एकाच ठिकाणी उभी आहे, जिचा वापर शून्य आहे, अशा गाडीच्या देखभालीसाठी आणि





### प्रशासनाकडून स्पष्टीकरणाची प्रतीक्षा

एकही आग न विझवणाऱ्या या गाडीवर पुन्हा १० लाखांची उधळपट्टी कशासाठी? आणि गाडी नेहमी रिकामी का असते? याचे उत्तर पाटोदा नगरपंचायत प्रशासन देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर या प्रकरणाची चौकशी झाली नाही, तर तीव्र आंदोलनाचा इशाराही काही जागरूक नागरिकांनी दिला आहे.

दुरुस्तीसाठी पाटोदा नगरपंचायतीने पुन्हा १० लाख रुपयांचे टेंडर काढले आहे. कोणतीही आग न विझवता आणि रस्त्यावर न उतरता या गाडीवर इतका मोठा खर्च कशासाठी केला जात आहे? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

भ्रष्टाचाराचा संशय

या गाडीच्या नावाखाली नगरपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार सुरू असल्याची चर्चा पाटोद्यात रंगली आहे. डिझेलच्या खर्चापासून ते दुरुस्तीच्या बिलापर्यंत सर्वच बाबतीत संशयास्पद व्यवहार होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सार्वजनिक पैशांची ही उघड लूट असून या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## बालझुंबड मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते -लाटकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बालझुंबड मधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळते. बालझुंबड स्पर्धेच्या आयोजनाबद्दल संयोजक राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांचे कौतुक करावे तेवढे कमी असून विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून पीपीटी सारख्या स्पर्धेत चांगल्या पद्धतीने सादरीकरण करावे असे मत पत्रकार प्रशांत लाटकर यांनी व्यक्त केले ते प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने बालझुंबडच्या पीपीटी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) स्पर्धा उदघाटन प्रसंगी बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सृजन विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे होते तर प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार





प्रशांत लाटकर, नगरसेविका सौ.रेखा जाधव, प्राचार्य प्रशांत कुमार (न्यु व्हिजन पब्लिक स्कूल,अंबाजोगाई) तर परिक्षक म्हणून मनोज कराड (खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, अंबाजोगाई),आर्या गलनकर, शेख शाहेबाज,क्षीरसागर आदी उपस्थित होते अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक बाळासाहेब कांबळे म्हणाले की, मागील २५ वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेल्या बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे, प्रगतीसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. पीपीटी सारख्या स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, देहबोली, क्रियाशीलता, संवाद, कल्पनाशक्ती, लेखन कौशल्य यांचा विकास होतो. याचा फायदा असा की, विद्यार्थ्यांचे वाचन वाढते असे सांगीतले.

स्पर्धेत २६ विषय होते. सादरीकरणासाठी २ ते ३ मिनिटांचा अवधी होता. यात कंटेंट ऑफ द प्रेझेंटेशन, कॉन्फिडन्स ॲण्ड व्हर्बल स्कील,ग्राफिक्स, साऊंड ॲण्ड व्हिडिओज,कलर स्किम ॲण्ड बॅकग्राऊंड, क्श्चन राऊंड यांना प्रत्येकी १० गुण असे एकूण ५० गुणांची ही स्पर्धा होती. ही स्पर्धा ५ ते ७ व ८ वी ते १० वी या दोन गटासाठी घेण्यात आली. विविध शाळांमधील ५ ते ७ वी गटात एकूण ६५ संघ आणि ८ वी ते १० वी गटात एकूण ७० संघ असे दोन गटात मिळून १३५ संघ सहभागी झाले होते.प्रास्ताविक राजेश कांबळे यांनी सुत्रसंचालन व आभार विजय तट यांनी केले तर उपस्थितांचे आभार समन्वयक राजेश कांबळे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शुभांगी मॅडम,शेख,पुजा सारडा प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

### नागरिकांच्या समस्या मार्गी

मिनी हायमास्ट बसवावेत. नवीन पथदिवे बसवून बंद किंवा नादुरुस्त असलेले पथदिवे तातडीने सुरू करावेत. नगर परिषद कार्यालयावर सोलार सिस्टीम बसवावी आणि मोठ्या चौकांतील हायमास्ट दिवे नियमितपणे सुरू ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शहरातील सर्व मालमत्तांची नोंद नगर परिषदेच्या रेकॉर्डमध्ये घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, जेणेकरून नगर परिषदेच्या महसुलात वाढ होईल. तसेच, पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल योजनेचे नवीन प्रस्ताव मंजूर करावेत. तसेच ज्यांना घरे मंजूर झाली आहेत, त्यांचे पुढील हप्ते तातडीने वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक पार्किंगची सुविधा निर्माण करावी. दर चतुर्थीला वेळेवर सायरन वाजवण्यात यावा. तसेच, बिंदुसरा नदी सुशोभिकरणाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी केली आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या सर्व नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी निवेदनात केली आहे. या मागण्यांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**मुख्याधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

भाजपच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न नगरपरिषद प्रशासनाचा राहील, असा सकारात्मक प्रतिसाद मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी नगरसेवकांनी प्रभागातील समस्या मांडल्या.

### माजी आ.भीमराव धोंडे

आपली उपस्थिती दाखवली आहे. याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आष्टी- पाटोदा -विधानसभा मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते माजी आ. भीमराव धोंडे यांनी मंगळवार दि.६ जानेवारी रोजी या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याला सदिच्छा भेट देऊन श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या चरणावर आपला माथा टेकवला आहे. यानंतर सप्ताह समितीच्या वतीने माजी आ. धोंडे यांचा सन्मान करण्यात आला यावेळी श्री. संत वामनभाऊ महाराज यांच्यावरती धोंडे परिवाराची नितांत श्रद्धा आहे. यामुळे दरवर्षी श्री क्षेत्र गहिनीनाथ गड, बोरगाव चकला, जन्मभूमी फुलसांगवी येथे सप्ताहाला भेट देऊन भाऊंचे आशीर्वाद घेत असल्याचे माजी आ. धोंडे यांनी सांगितले आहे. यावेळी माजी जिप. सदस्य मोहनराव ढाकणे, अर्जुन बप्पा खेडकर, सरपंच भागवत वारे, महारुद्र खेडकर, नामदेव खेडकर, उमेश खेडकर अमोल सानप आदीची उपस्थिती होती.

### महिला उद्योजकतेचा महाकुंभ!

या प्रदर्शनाला हजेरी लावली. एकाच छताखाली सर्व दर्जेदार वस्तू मिळाल्याने ग्राहकांनीही समाधान व्यक्त केले. उद्योजिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. दिवसभर चाललेल्या या प्रदर्शनात स्टॉलधारकांची मोठी विक्री झाली. अनेक महिला उद्योजिकांनी एकाच दिवसात हजारो रुपयांची विक्री केल्याने प्रदर्शनात लाखोंची उलाढाल झाली. तेजस्विनी ग्रुपमुळे आम्हाला हक्काची बाजारपेठ मिळाली, अशा शब्दांत पुणे आणि अकोल्याहून आलेल्या स्टॉलधारकांनी आपला आनंद व्यक्त केला. सर्वच स्टॉलधारक या प्रतिसादाने अतिशय खुश दिसून आले. महिलांनी आत्मनिर्भर व्हावे हीच आमची जिद्द आहे. संक्रांतीच्या निमित्ताने महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देता आले आणि समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सन्मान करता आला, याचे समाधान मोठे आहे. अशी प्रतिक्रिया - सोनल अरविंदसिंह पाटील (संचालिका, तेजस्विनी ग्रुप) यांनी दिली. शहरातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठीत नागरिकांनी भेटी देऊन तेजस्विनी ग्रुपच्या कार्याचे कौतुक केले. सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कार्यामुळे शेकडो महिला स्वकर्तृत्ववान बनल्या असून, या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव या भव्य उपक्रमाला मिळाला.

### महिलांच्या अर्थिक

त्यांनी सांगितले.डॉ.सुनिता तोंडगे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांच्या आयुष्यात समाजाकडून झालेली अवहेलना, छळ याला न डगमगता त्यांनी महिलांसाठी पहिली शाळा सुरू करीत शिक्षणाची दारे खुली केली सावित्रीबाई यांच्या जीवनातील संघर्ष आठवून आजच्या महिलांना आपल्या जीवनात देखील संघर्ष करण्यासाठीची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. विजया पाटील,मानसी पवार यांनी मनोगत व्यक्त केले.डॉ.सुनिता तोंडगे यांना मिस महाराष्ट्र मिसेस रनर अप फर्स्ट हा किताब मिळाल्याबद्दल व मानसी पवार यांनी मिस महाराष्ट्र पुरस्कार पटकावल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांचे आभार सुरेखा खंडाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे,पतसंस्थेचे व्यवस्थापक सागर कंगळे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी परिसरातील महिला उपस्थित होत्या.

### आष्टी तालुका पत्रकार संघाची

तर कार्याध्यक्ष भीमराव गुरव यांनी संघ अधिक सक्रिय, सक्षम व प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. या बैठकीत तालुक्यातील पत्रकारितेची गुणवत्ता वाढवणे, नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करणे, सामाजिक प्रश्नांवर प्रभावी लेखन करणे, तसेच पत्रकारांच्या एकजुटीला बळकटी देणे, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या वेळी शरद तळेकर, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, सचिन रानडे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे आष्टी तालुका पत्रकार संघ अधिक सक्षम होऊन पत्रकारांच्या हितासाठी भक्कमपणे कार्य करेल, अशी भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त केली.

--------------

## आदर्श शिक्षकांचा माजी आमदार केशव आंधळे व संजय आंधळे यांच्या हस्ते सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक गोरक्षनाथ मुंडे सर, रमेश धायतिडक सर, तुकाराम राठोड सर या तिन्ही गुरुजनांचा वडवणी येथे माजी आमदार केशवराव आंधळे व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या वतीने अभिनंदन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अनेक शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

बीड जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने नुकताच मागील तीन वर्षांपासून रखडलेला जिल्ह्यातील सर्व आदर्श शिक्षकांचा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच मोठ्या दिमाखात बीड याठिकाणी संपन्न झाला. यामध्ये बीड जिल्हा परिषदेचा सन



२०२३ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेरी बोरखडी शाळेचे सहशिक्षक तुकाराम राठोड सर, आणि सन २०२५ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोठारबन शाळेचे प्राथमिक पदवीधर रमेश धायतिडक सर या तिन्ही आदर्श गुरुजनांचा काल शनिवारी वडवणी शहरातील आंधळे कुटुंबीयांच्या समाधान या निवासस्थानी माजी आमदार केशवराव आंधळे व भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी अभिनंदन सत्कार करुन त्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक तथा युवा उद्योजक रणजीत भैय्या धस, आबासाहेब आंधळे सर, उध्दव बडे सर, विष्णु आंधळे सर, डे

## केवड येथील शाळेला ज्येष्ठ पत्रकार दिलीप सपाटे यांची सदिच्छा भेट

**बीड । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा केवड येथे दिलीप सपाटे (मुंबई मंत्रालय, पत्रकार) यांनी नुकतीच भेट देऊन शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी शाळेसाठी किचन रूम तसेच संरक्षण भिंत उभारून देण्याचे आश्वासन दिले. यासोबतच शाळेसाठी रोख रक्कम २५०० देऊन शाळेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.**

या शालेय भेटीप्रसंगी ग्रामसेवक जुगदर, सरपंच बाळासाहेब सत्वधर, ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार, मुख्याध्यापक पठाण मुखतार सर, सहशिक्षिका श्रीमती हंगे सुवर्णमाला, ग्रामस्थ व पालक वर्ग मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्ता वाढीसाठी पालकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## शिवसेना शाखा व शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे प्रेरणास्थान आदरणीय बाळासाहेब ठाकरे साहेब व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, संसदरत्न मा. खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या प्रेरणेतून शिवसेना सचिव श्री. संजयजी मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले साहेब यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि त्यांचे शुभहस्ते गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी येथे शिवसेनेच्या शाखांचे भव्य व उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न झाले.शाखाप्रमुख अभय भांडवलकर उपशाखा प्रमुख शुभम नरवडे सचिव प्रतीक मेंडके यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी ॲड. चंद्रकांत नवले यांचा बुलंद हुंकार एका नव्या परिवर्तनाची साक्ष देत होते.

या कार्यक्रमासाठी तालुका प्रमुख उद्धवजी मडके, विक्रमराजे भोसले, शहरप्रमुख मुकेशजी महाजन, युवासेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, युवा सेना शहरप्रमुख गणेश पवार, प्रकाश काका नरनाळे, नागेशजी मिठे, शिवराज उगले, स्वप्नील आबुज (विशेष उपस्थिती), ॲड. सचिन गायकवाड, अनिकेत भांडवलकर, पवन काळे, ओमकार गायकवाड, रवी मेंडके, कृष्णा गायकवाड, दत्ता चौधरी, आर्यन प्रताप भांडवलकर,मराठे, अजय शिंदे, महादेव काळे, अंकुश नन्नवरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्तित होते. तद्नंतर नगर रोड फुलसांगवी फाटा येथे शिवराज उगले, युवा सेना लोकसभा प्रमुख आष्टी मतदार संघ यांच्या शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित भैया कोळपे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

या उद्घाटन समारंभ प्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख ड. चंद्रकांत नवले यांनी पहिल्यांदा जिल्हाप्रमुख असताना केलेल्या कामांची माहिती दिली यामध्ये संपूर्ण जिल्ह्यामध्ये गाव, तांडा, वाडी, वस्ती, पाड्यापर्यंत शिवसेना पक्षाचे विचार पोहोचविण्यासाठी असंख्य शाखा स्थापन करून विविध ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद मध्ये सत्ता स्थापन करून शिवसेनेचा भगवा फडकविला असल्याचे सांगितले. तसेच कार्यकर्त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी झुणका भाकर केंद्र, पोलीस पाटील पदी नेमणूका, शाळा/ कॉलेजेस यासह विविध कामे मिळवून



दिल्याचे सांगितले. आणि आता महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, संसदरत्न मा. खा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब, शिवसेना सचिव मा. श्री. संजयजी मोरे साहेब यांना अपेक्षित असलेले काम आपल्या सर्वांना मिळून करावयाचे असून यासाठी संपूर्ण गेवराई मतदार संघात दौरा करून, प्रत्येक गावात शाखा स्थापन करून, धर्मवीर आनंदजी दिघे साहेब नागरी सहायता कक्ष स्थापन करून आणि जनतेच्या समस्यां सोडवून मतदार संघात शिवसेना पक्षाचे पोषक वातावरण तयार करावयाचे असून नगरपरिषद निवडणुकीत रणनीती आखण्यासाठी मला जास्तीचा वेळ मिळाला नसल्याने येणाऱ्या पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये शिवसेना पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी होतील यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करावयाचे आहे असे सांगितले. वंदनीय बाळासाहेबानंतर मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब हेच खरे महाराष्ट्राला न्याय देणारे ठरले असून ते सातत्याने १८-१८ तास जनतेसाठी काम करतात त्यांचीच प्रेरणा घेऊन मीही स्वतः १८-१८ तास काम करण्यास तयार असून कोणत्याही वेळी अडचण आल्यास मला हाक द्या मी आपल्या मदतीसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही दिली. यावेळी उपजिल्हाप्रमुख श्री. नारायण शिंदे, गेवराई विधानसभा प्रमुख श्री. नवनाथ गवते, गेवराई शहर प्रमुख श्री. मुकेश महाजन, गेवराई तालुकाप्रमुख श्री. उद्धव मडके, श्री. विक्रमराजे भोसले, शिरूर तालुकाप्रमुख श्री. सुनील सोनवणे, श्री. बिभीषण मोघे, श्री. नागेश मिठे, प्रा. सचिन उबाळे, श्री गणेश पवार, श्री. प्रकाश नरनाळे, सरपंच श्री. दिलीप उगले, श्री. स्वप्निल आबुज सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन

पुणे जिल्हयातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे आशिल नामे, सौ. सिमा रजनीकांत कसवे, रा. ऐ-१६ सी, फ्लॅट नं.११०८, रिव्हर रेसिडेंसी, चिखली, मोशी रोड, चिखली, पुणे ४११०६२ ह.मु. पिंपरी चिंचवड, म्हाडा बिल्डींग, पुणे.ता.जि. पुणे यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरून या जाहिर प्रगटनावारे सुचित करण्यात येते की,

मौजे चिखली ता. हवेली जि. पुणे येथील गट नं. ९० मधील बांधलेल्या रिवर रेसिडेन्सी, ए-१६ सहकारी गृह रचना संस्था मर्यादित यामधील बिल्डिंग नंबर ए१६ सी मधील अकराव्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ११०८ ज्याची साईज ५१४.२९ चौ. फुटअसुन सदर मिळकत पिंपरी चिंचवड महा नगर पालीका हद्दीतील मिळकत नं. ११३०१०२१६५ हा फ्लॅट आहे.

सदरची मिळकत आमचे अशिलाची व तिचे पतीची स्वकष्टार्जित मिळकत असुन सदर मिहकतीमध्ये आमचे आशिलाचा व तिच्या मुलांचा कायदेशीर अविभक्त हिस्सा आहे. परंतु आमचे अशिलाचे व तिचे पती मध्ये कौटुंबिक वाद चालु असुन सदरचा वाद न्याय प्रविष्ठ असुन आमचे अशिलाचे पती नामे रजनीकांत अशोक कसबे हे आमचे आशिलाचा व तिथे अज्ञान मुलांचा अविभक्त हिस्सा आमचे अशिलास मिळु नये या हेतुने वर नमुद मिळकत त्यांचे नांवे नोंद असल्याचा गैरफायदा घेऊन सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तींना विक्री करण्याचा प्रयत्नात आहे. वास्तविक पाहता सदरच्या मिळकतीमध्ये आमचे अशिलाचा व तिचे अज्ञान मुलांचा अविभक्त कायदेशीर हिस्सा असल्याने सदर मिळकतीमध्ये आमचे आशिलाचा व तिचे अज्ञान मुलांचे कायदेशीर हितसंबंध गुंतलेले आहेत.

करिता प्रस्तुतच्या जाहिर प्रगटनावारे पुणे जिल्ह्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, वर नमुद मिळकतीशी कोणीही रजनीकांत अशोक कसबे यांचे सोबत व त्यांचे कुटुंबातील कोणत्याही व्यक्ती सोबत ईसारपावती, करारनामा, मुखत्यारपत्र, भाडेपत्र, गहाणखत, दानपत्र, तारणपत्र, बक्षीसपत्र अथवा ईतर कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये केल्यास सदरचा व्यवहार आमचे आशिलावर कायदेशीरपणे बंधनकारक राहणार नाही. सदरचा व्यवहार केल्यास होणाऱ्या सर्व परिणामाची व खर्चाची सर्वस्वी जबाबदारी सदर व्यक्तीवर असेल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटण,

स्थळ-पुणे
दिनांक ०६/०१/२०२६ मार्फत
**ॲड तेजेश एस. नेहरकर,**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९८२३६६७४९४

जाहिर प्रगटन देणार
**सीमा रजनीकांत कसबे व अज्ञान मुलगा**
रा. फ्लॅट क्र. ६०३ वा मजला भागीरथी बिल्डींग म्हाडा मोरेवाडी पिंपरी चिंचवड पुणे ४११००८ मो. ९१७२५४४४११

cmyk




# राज्यातील एकावन्न कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे होणार राष्ट्रीयीकरण

## सोळा समितींची मागविली माहिती, शेतकऱ्यांना होणार फायदा

पुणे। प्रतिनिधी

राज्य शासनाने राज्यातील प्रमुख बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा (ई-नाम अंतर्गत) देण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे. आता, विधि व न्याय विभागाने त्याचे गॅझेट प्रसिद्ध केले असून, कोल्हापूरसह सोळा बाजार समित्यांची माहिती पणन विभागाने मागवली आहे. यामध्ये समित्यांमध्ये वर्षभरात येणारी आवक आणि त्यातील परराज्यातील शेती मालाची आवक किती? ही माहिती बाजार समित्यांनी पणन विभागाकडे सादर केली आहे.

बाजार समित्यांच्या राष्ट्रीय दर्जाचा निर्णय लवकरच होण्याची दाट शक्यता आहे. शासनाने बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर कायद्यात दुरुस्ती केली आहे. ज्या बाजार समितीमध्ये ८० हजार टनांपेक्षा अधिक



आवक आहे, अशा ५१ बाजार समित्या असून त्यांना राष्ट्रीय दर्जा दिला जाणार आहे. पहिल्या टप्यात सोळा समित्यांचा समावेश केला आहे. या समित्यांकडून २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शेतीमाल आवकेची माहिती मागवली आहे. संबंधित समित्यांनी सहकार विभागाकडे शेतीमालाच्या आवकेची माहिती पाठवली आहे. एकूणच शासनाच्या पातळीवरील हालचाली पाहता राष्ट्रीय दर्जाबाबतचा निर्णय लवकरच होईल, असे संकेत मिळत आहेत. शेती मालाला योग्य भाव मिळावा, यासाठी राष्ट्रीय दर्जा देण्यामागे शासनाचा हेतू आहे. यामुळे शेतमालाच्या विक्रीत पारदर्शकता, एक देशव्यापी परवाना आणि शुल्क प्रणाली लागू होणार आहे.

या बाजार समित्यांकडून मागवली माहिती

कोल्हापूर, नाशिक, पुणे (ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, बुलढाणा, ठाणे, जळगाव, जालना, सांगली, वाशिम, अकोला, आहिल्यानगर, लातूर, सोलापूर, नागपूर इ.




### महत्वाच्या घटना

१६१० : गॅलेलिओ यांनी दुर्दार्शीच्या सहाय्याने इयो, युरोपा, गॅनिमिडी आणि कॅलिस्टो या गुरूच्या चार उपग्रहांचा शोध लावला.
१६८० : मुंबई कौन्सिलने शिवाजी महारांजाबरोबर करायच्या कराराचा मसुदा तयार केला.
१७१४ : पहिल्यांदा हेनरी मिल ने टाईप राईटर चा शोध लावला.
१७८९ : अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची पहिली निवडणूक होऊन त्यान जॉर्ज वॉशिंग्टन विजयी झाले.
१९२२ : पंजाब केसरी लाला लजपतराय आणि त्यांचे सहकारी पंडित संतानम यांना राजद्रोहाच्या आरोपावरुन १८ महिन्यांची शिक्षा झाली.
१९२७ : न्यूयॉर्क ते लंडन अशी अटलांटिक महासागर पार करणारी दूरध्वनीसेवा सुरू झाली.
१९३५ : कोलकाता येथे 'इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी'चे उद्‌घाटन झाले. पुढे १९५१ मधे तिचे मुख्यालय दिल्लीला हलवण्यात आले.
१९५९ : क्यूबातील फिडेल कॅस्ट्रो यांच्या सरकारला अमेरिकेने मान्यता दिली.
१९६८ : अमेरिकेचे सर्व्हेयर यान चंद्राच्या टायको या विवराच्या किनारी उतरले.
१९७२ : कन्याकुमारी येथील विवेकानंद केन्द्राचे काम पूर्ण झाले.
१९७८ : एम. व्ही. चंद्रगुप्त ही मालवाहू नौका ६९ कर्मचार्यांसह होनोलुलूजवळील महासागरात बेपत्ता झाली.
१९८० : पुन्हा एकदा लोकसभेच्या निवडणूकांमध्ये कॉंग्रेस बहुमताने विजयी.
२००३ : जपान ने विकास कामांसाठी भारताला ९० कोटी डॉलर्सची मदत देण्याची घोषणा केली.
२०१४ : आजच्या दिवशी शेख हसीना ने बांगलादेश च्या निवडणुक जिंकली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९३ : जानकीदेवी बजाज – स्वातंत्र्य वीरांगना (मृत्यू: २१ मे १९७९)
१९२० : सरोजिनी बाबर – लेखिका, संतसाहित्याच्या अभ्यासिका व राजकारणी (मृत्यू: १९ एप्रिल २००८)
१९२१ : चंद्रकांत गोखले – अभिनेते (मृत्यू: २० जून २००८)
१९२५ : 'प्रभात' स्वातंत्र्यवीर सावरकर यांची कन्या.
१९२८ : विजय तेंडुलकर – नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)
१९४८ : शोभा डे – विदुषी व लेखिका
१९६१ : सुप्रिया पाठक – अभिनेत्री
१९६७ : जगप्रसिद्ध अभिनेता इरफान खान यांचा जन्म.
१९७९ : बिपाशा बासू – अभिनेत्री व मॉडेल.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९८९ : मिचेनोमिया हिरोहितो – दुसऱ्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (जन्म: २९ एप्रिल १९०१)
१९४३ : वाय फाय चा शोध लावणारे संशशोधक निकोला टेसला यांचे निधन.
२००० : डॉ. अच्युतराव आपटे – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची व त्याद्वारे सर्वांगीण विकासाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी आयुष्य वेचलेले विद्यार्थी सहायक समितीचे संस्थापक व स्वातंत्र्यसैनिक.
२०१६ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांचे निधन.

## ढगाळ वातावरणात आंबा पिकाचे संरक्षण



शेतकऱ्यांसाठी आंबा हे महत्त्वाचे फळपीक आहे. मोहोर येण्यापासून ते फळ काढणीपर्यंत तुडतुडे, फुलकिडी, भुरी रोग, फळमाशी तसेच फळगळ अशा विविध समस्या उद्भवतात. योग्य वेळी काळजी घेतल्यास नुकसान कमी होऊन उत्पादन वाढवता येते. त्यासाठी आंबा मोहोर संरक्षण करण्याबाबतचा सल्ला महत्वाचा ठरतो.

रोग व किडींचा प्रादुर्भाव : पावसाळ्यानंतर मुळांना पाण्याचा ताण व त्यानंतर १० ते १५ दिवस १२ ते १५ अंश सेल्सिअस पेक्षा कमी तापमान राहिल्यास परिपक्व पालवीवर चांगला मोहोर येतो. मात्र, या काळात तुडतुडे व फुलकिडी यांचा प्रादुर्भाव होतो.

असे करा व्यवस्थापन : थंड, कोरडे वातावरण व रात्रीची जास्त आर्द्रता असल्यास भुरी रोग वाढतो. मोहोर व पानांवर राखेसारखी पावडर दिसून मोहोर सुकतो व फलधारणा होत नाही. संरक्षण उपाय म्हणून बागेत गवत वाढू देऊ नये. तुडतुडे आणि फुलकिडी यांचा प्रादुर्भाव दिसताच प्रती एक लिटर पाण्यात डेल्टामेथ्रिन १ मिली किंवा पुढील फवारणीस लॅमडा सायहॅलोथ्रिन ०.६ मिली अथवा आझाडिरॅक्टिन ३ मिली वापरावे. भुरी रोगाच्या नियंत्रणसाठी मोहोर निघताना गंधक २ ग्रॅम फवारावे. ढगाळ वातावरणात १५-२० दिवसांच्या अंतराने हेक्झाकोनाझोल ०.५ मिली किंवा कार्बेन्डाझिम व मॅनकोझेब १ ग्रॅम फवारणी करावी. रस शोषक किडी तुडतुडे आणि फुलकिड नियंत्रणासाठी वर्टीसिलीअम लेकानी ५ ग्रॅम उपयुक्त ठरते. तसेच फुलकिडीसाठी एकरी ५० ते १०० निळे चिकट सापळे लावावेत. ढेकणाची लागण दिसताच वर्टिसिलीअम लेकानी ५ मिली फवारावे. क्लोरपायरीफॉस २ मिली आणि फिश ऑइल फवारणी करावी. आंबा हे पर-परागीभवनाचे पीक असून मधमाशा परागीभवनात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मोहोर फुलण्यापासून ते फळधारणेपर्यंत २० ते २५ दिवस रासायनिक कीटकनाशके टाळावीत, बागेत मधमाशीच्या पेट्या ठेवाव्यात. यामुळे फलधारणा सुधारून ३० ते ३५ टक्के उत्पादन वाढ शक्य होते.

फळमाशीमुळे अकिध नुकसान : आंबा फळवाढीच्या अवस्थेत फळमाशी व पिठ्या ढेकूण (मेलिबग) या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. फळमाशी मादी फळाच्या सालीखाली अंडी घालते. त्यातून तयार झालेल्या अळ्या फळाचा गर खात असल्याने फळे कुजतात व विक्रीयोग्य राहत नाहीत. या किडीमुळे सुमारे ३० ते ४० टक्के नुकसान होते. त्याच्या नियंत्रणासाठी जानेवारीपासून बागेत मिथाईल यूजेनॉलयुक्त फळमाशी सापळे एकरी ४ लावावेत. फळांना पेपर बॅग लावाव्यात व खाली पडलेली फळे त्वरित गोळा करून नष्ट करावीत.

## तयारी कलिंगड, खरबूज लागवडीची...

कलिंगड, खरबूज लागवड जानेवारी महिन्यात सुरू होते. या लागवडीची तयारी आतापासूनच करावी. बाजारपेठेच्या मागणीनुसार जातींची निवड करावी. कलिंगड, खरबूज वेलीच्या वाढीसाठी २३ ते २७ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. तापमान १८.३ अंश सेल्सिअस पेक्षा कमी किंवा ३२.२ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त असल्यास वेलीच्या वाढीवर व फळधारणेवर विपरीत परिणाम होतो. दमट हवामानामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होतो. कलिंगड, खरबूज लागवड बाजारपेठेची मागणी पाहून जानेवारी-फेब्रुवारी दरम्यान करावी. जातींची निवड बाजारपेठेच्या मागणीनुसार करावी.

जमिनीची निवड : खरबुजासाठी जमिनीची निवड करताना खोल, पाण्याचा निचरा होणारी गाळाची जमीन योग्य ठरते. भारी काळी जमीनही उपयुक्त ठरते; परंतु त्यामध्ये भरपूर प्रमाणात सेंद्रिय खत असणे तसेच पाण्याचा निचरा असणे आवश्यक असते. आम्ल धर्मीय जमिनीतही हे पीक तग धरू शकते. कलिंगडासाठी रेताड, मध्यम काळी, पोयट्याची किंवा गाळाची आणि चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७ च्या दरम्यान असावा. भारी जमिनी वेलींची वाढ जास्त होते. अशा जमिनीत पाण्याचा व जमिनीचा समतोल न साधल्यास फळांना भेंगा



पडतात. शक्यतो जमीन चोपण अथवा अतिशय हलकी नसावी.

लागवड पद्धत : कलिंगड लागवडीसाठी जमीन नांगरून व कुळवून लागवडीसाठी तयार करावी. लागवडीसाठी चार मीटर अंतरावर पाट किंवा सऱ्या काढाव्यात. पाटाच्या दोन्ही बाजूस ९० से.मी. अंतरावर ३० सें.मी. लांब, ३० सें.मी रुंद व ३० सें.मी. खोल खड्डे करून त्यात १ ते १.५ किलो चांगले कुजलेले शेणखत आणि व १० ग्रॅम कार्बारील (१० टक्के) पावडर मिसळून खड्डा भरावा. खरबूज लागवडीसाठी उंच गादिवाफ्यामध्ये (दोन मीटर रुंद) कडेला बियांची पेरणी करावी किंवा दुसऱ्या पद्धतीमध्ये नदीच्या पात्रातील लागवडीमध्ये १.५ ते २.५ मीटर दोन्ही ओळीतील अंतर ठेवून ६० ते ७५ सें.मी. व्यासाचे वर्तुळाकार खड्डे करावेत. या खड्ड्यामध्ये शेणखत २ ते २.५ किलो मिसळून बियांची पेरणी करावी. पेरणीपूर्व बियाण्यास प्रति किलो बियाण्यास तीन ग्रॅम थायरम या बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी. चांगल्या उगवण क्षमतेसाठी बी रात्रभर कोमट पाण्यात भिजवून घेतल्यास उगवण चांगली होते. प्रत्येक ठिकाणी दोन चांगली जोमदार रोपे ठेवावीत.

कलिंगडाच्या सुधारित जाती : असाही यामाटो, शुगर बेबी, अर्का माणिक, अर्का ज्योती, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा शरबती, हरा मधू खतमात्रा :रासायनिक खते देताना हेक्टरी १०० किलो नत्र (२१७ किलो युरिया), ५० किलो स्फुरद (३१२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५० किलो पालाश (८३ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. खते देताना लागवडी पूर्वी युरिया १०८ किलो, सिंगल सुपर फॉस्फेट ३१२ किलो आणि मुरेट ऑफ पोटॅश ८३ किलो ही खतमात्रा द्यावी. राहिलेल्या युरियाची अर्धी मात्रा १०८ किलो एक महिन्यानंतर वेली शेंडा धरू लागल्यावर द्यावा. वेलीच्या खोडाभोवती बांगडी पद्धतीने खत द्यावे.

## असा करा जनावरांसाठी संतुलित आहार



जर तुम्हालाही पशुपालन करून चांगले कमवायचे असेल तर त्यासाठी तुम्हाला त्याचे अन्न, राहणीमान आणि आरोग्य इत्यादी अनेक विशेष गोष्टींची काळजी घ्यावी लागेल. परंतु या सर्व गोष्टींपैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्राण्यांचा संतुलित आहार (ॲनिमल फीड), ज्याच्या सेवनाने त्यांचा लवकर विकास होतो आणि त्याचबरोबर अनेक रोगांशी लढण्याची क्षमताही वाढते. संतुलित आहार देणे गरजेचे आहे. ज्यामुळे अनेक फायदे होतात.

दूध उत्पादन क्षमतेत वाढ : हे खाल्ल्याने जनावरांची पचनक्रिया सुधारते आणि त्याच बरोबर शरीर आतून मजबूत होते. आजकाल पसरत असलेल्या प्राणघातक रोगांशी लढण्यास हा प्राणी सक्षम असेल. संतुलित आहार घेतल्यास मादी जनावर दरवर्षी निरोगी वासराला जन्म देऊ शकते. प्राण्यांच्या संतुलित आहारात अनेक प्रकारचे पौष्टिक घटक आढळतात, जसे की प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, खनिज-लवण आणि अनेक विशेष जीवनसत्त्वे ज्यांचे प्रमाण चांगले असते.घरीच बनवा संतुलीत आहार : तुमच्या घरी प्राण्यांसाठी संतुलित आहार सहज बनवू शकता, यासाठी तुम्हाला फार काही करण्याची गरज नाही. सर्वप्रथम, तुम्हाला हिरवे गवत आणि कोरडा चारा घ्यावा लागेल, जो तुम्हाला कुठेही सहज मिळेल. नंतर ते तयार करण्यासाठी सुमारे २५ ते ३५ टक्के केक, २५ ते ३५ टक्के भरड धान्य, १० ते ३० टक्के भुसा किंवा कोंडा २ टक्के सामान्य मीठ इत्यादी चांगले मिसळा. हवे असल्यास तुम्ही कोणत्याही चांगल्या कंपनीचे ॲनिमल फूड त्यात मिसळू शकता. जेणेकरून त्याचा फायदा आणखी प्राण्यांना होईल. पण त्याचे प्रमाण जास्त नसावे हे लक्षात ठेवा. यामुळे तुमचा फायदा होणार आहे.

## असे करा कांदा पिकावरील फुलकिड्यांचे नियंत्रण

कांदा पिकावर प्रामुख्याने फुलकिड्यांचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव अधिक दिसून येतो. या किडीच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे मोठे नुकसान होते. फुलकिडे आकाराने लहान परंतु अधिक नुकसानकारक असतात. ही कीड पानातील रस शोषून चांदीसारखे डाग, पट्टे व कोरडी टोक निर्माण करते. त्यामुळे झाडाची वाढ खुंटते आणि कांदा पोसला जात नाही आणि लहान राहतो. या किडीचा कांदा पिकाबरोबर लसूण, कोबी-फुलकोबी, पालक, मेथी, टोमॅटो, मिरची, कापूस तसेच विविध तणांवरही प्रादुर्भाव दिसून येतो. 'आयरिश यलो स्पॉट' या विषाणूजन्य रोगाचा प्रसार फुलकिड्यांमार्फत होतो. या किडीच्या अतिजलद जीवनचक्रामुळे त्यावर नियंत्रण मिळवणे कठीण होते. कांदा हे महत्त्वाचे निर्यातक्षम व नगदी पीक असल्याने फुलकीड नियंत्रणासाठी तातडीने उपाय करणे आवश्यक आहे. पिकाचे योग्य निरीक्षण करून नियंत्रणाच्या उपाययोजनांचा अवलंब केल्यास प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होते.

फुलकीडे यांची ओळख : फुलकीडे हे आकाराने लहान, फिकट तपकिरी रंगाचे असतात. ते कांद्याच्या पातीतील रस शोषण करतात आणि चांदीसारखे डाग निर्माण करतो. प्रौढ मादी पानांच्या ऊतींमध्ये अंडी घालते. अंड्यातून बाहेर पडलेल्या अळ्या पानांतील रस शोषून झाडाची वाढ खुंटवतात. या अळ्यांच्या दोन इन्स्टार अवस्था पानांच्या घडीत किंवा कंदाच्या मुळाजवळ जमा होऊन नुकसान करतात. त्यानंतर त्या मातीमध्ये कोषावस्थेत जातात. नंतर प्रौढ होऊन पुन्हा पिकावर येतात. अनुकूल हवामानात जीवनचक्र २ ते ३ आठवड्यांत पूर्ण होते. त्यामुळे कांद्याच्या पूर्ण वाढीच्या हंगामात



४ ते ६ पिढ्या तयार होऊ शकतात.

प्रादुर्भावाची लक्षणे : फुलकिडे पानांतील रस शोषून पानांच्या पृष्ठभागावर पांढरे डाग निर्माण करतात. त्यामुळे पानांची टोके तपकिरी पडून वाळतात. प्रादुर्भाव तीव्र झाल्यास पानांचे नुकसान वाढून झाडाची वाढ खुंटते. प्रकाश संश्लेषण क्रियेत अडथळा निर्माण होतो. परिणामी झाडाची अन्ननिर्मिती क्षमता घटते, ज्याचा थेट परिणाम कंदाच्या आकार व गुणवत्तेवर होतो. विशेषतः कंद निर्मितीच्या सुरुवातीच्या अवस्थेत किडीचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असते. हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात प्रादुर्भाव झाल्यास नुकसान तुलनेने कमी असते. कारण कांदा पीक त्या काळात किडीच्या प्रादुर्भावास तुलनेने जास्त सहन करू शकते. रसशोषण करताना किडीने पानांवर केलेल्या जखमांमुळे पातीच्या कांद्याची गुणवत्ता खालावते. फुलकिडे हे आयरिश यलो स्पॉट' या विषाणूजन्य रोगाचे वाहक असल्याने कांद्यात अतिरिक्त नुकसान होते.

असा होतो प्रसार : शेतातील व बांधावरील तणांमधून प्राथमिक अवस्थेत प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. कांदा लागवडीजवळील गहू, ज्वारी, मका यांसारख्या धान्य पिकांमधून प्रसार होऊ शकतो. जोराचे वारे, कोरड्या वातावरण प्रसार जास्त होतो. कांदा पिकातील संक्रमित कंद, रोपे, पाने किंवा इतर पीक अवशेषांची वाहतूक.

एकात्मिक व्यवस्थापन : पीक अवशेष, तण व इतर अवांछित झाडे काढून नष्ट करावीत. कारण फुलकिडे यात लपून वाढतात. कांदा लागवडीमध्ये स्वच्छता राखावी. नियमित खुरपणी करून शेत तणविरहित ठेवावे. प्रादुर्भावग्रस्त कांदा लागवडीपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी कांदा लागवडीच्या कडेने २ ते ३ ओळी ज्वारी, मका किंवा बाजरी या पिकांची लागवड करावी. त्यामुळे फुलकिड्यांपासून कांदा पिकाचे संरक्षण होते. उष्ण व कोरड्या हवामानात फुलकिड्यांचा वाढ अधिक होते. त्यामुळे पिकाचे नियमित निरीक्षण करावे.

पीक फेरपालट करावी. कारण, एकाच शेतात वर्षानुवर्षे कांदा लागवड केल्यास किडीच्या वाढीस पोषक स्थिती निर्माण होऊन प्रादुर्भाव अधिक होतो.

नियंत्रणासाठी कांदा लागवड झाल्यानंतर १५ दिवसांनी प्रति एकरी किमान ४० निळे चिकट सापळे पिकाच्या उंचीनुसार एक फूट उंचीवर लावावेत. कांदा पिकातील फुलकिड्यांचा प्रादुर्भाव जाणून घेण्यासाठी शेतामध्ये गाजर, मुळा यांसारख्या सापळा पिकांची लागवड करावी. मेटारायझीयम ॲनिसोप्ली किंवा लेकॅनिसिलियम लेकॅनी ५ मिलि. अझाडिरेक्टीन (३००० पीपीएम) ३ मिलि. फुलकिडे हे प्रामुख्याने कांदा पिकाच्या गाभ्यामध्ये खालच्या भागावर किंवा पानाच्या तळाशी लपून बसतात. त्यामुळे कीटकनाशक आतील संरक्षित भागापर्यंत पोहोचणे कठीण असते. परिणामी, योग्य पद्धतीने फवारणी न झाल्यास प्रभावी नियंत्रण मिळत नाही. यासाठी योग्य प्रमाणात दाब आणि जास्त प्रमाणात फवारणी करावी लागते.

cmyk

cmyk






राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# ग्रामसेवकाला निलंबित करण्यासाठी पाच दिवसापासून उपोषण सुरु

## गटविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी पंचायत समिती अंतर्गत गुंज बुद्रुक येथील ग्रामसेवकाला निलंबित करण्यासाठी घनसावंगी पंचायत समिती समोर पाच दिवसापासून उपोषण सुरू आहे परंतु याप्रकरणी गटविकास अधिकारी कोणतेही कारवाई करीत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे उपोषणकर्त्याची तब्येत खलवली असून याप्रकरणी काही प्रकार घडल्यास याला जबाबदार गटविकास अधिकारी विस्तार अधिकारी ग्रामसेवक यांच्यावर राहील.

सदरील उपोषण०१/०१/२०२६ पासून सुरू करण्यात आले आहे उपोषण बाबत पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना ११ डिसेंबर रोजी चौकशी करणे संदर्भात निवेदन देण्यात आले होते परंतु या संदर्भात गट विकास अधिकारी यांनी काहीच कारवाई न केल्यामुळे उपोषण सुरू करण्यात आले. पंचायत समिती कार्यालयास अनेकदा तक्रार करून देखील संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरुद्ध आपण कोणत्याही प्रकारची



कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वेळोवेळी दिलेल्या अर्जाच्या विषयांकित नमूद तक्रारीवर योग्य ती कार्यवाही होईपर्यंत आमरण उपोषणास करणार असल्याबाबत २२ डिसेंबर रोजी अर्ज दाखल केला होता परंतु गट विकास अधिकारी श्रीमती. ऐश्वर्या चितारे यांनी मी नवीन आहे मला प्रकरणाची कोणतीही माहिती नाही त्यामुळे मला ७ दिवसाचा वेळ द्या मी तुमच्या तक्रारीची कायदेशीरित्या. कार्यवाही करते असे म्हणून विनंती केल्यामुळे सदरचे आमरण उपोषण हे पुढे ढकलले होते परंतु गट विकास अधिकारी श्रीमती. ऐश्वर्या चितारे यांनी देखील कोणतीही कार्यवाही याबाबत केल्याचे दिसत नाही. त्यामुळे ग्रा. का. गुंज बुद्रुक येथे कार्यरत श्री तमरे यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर व ईतर योग्य त्या कायद्यानिशी गुन्हे दाखल करावेत. तोपर्यंत आपल्या कार्यालया समोर आमरण उपोषणास सुरू राहणार आहे माझ्या जीवितास कुठल्याही प्रकारची हानी अथवा इजा पोहोचल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली व अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी/ग्रामसेवक व सरपंच गुंज (बू) यांची राहील असे निवेदनात राजानंद शेळके यांनी म्हटले आहे.

## विद्यार्थ्यांनी रांगोळी रेखाटत दिला मतदान जागृतीचा संदेश

अहिल्यानगरे। प्रतिनिधी

शहरातील महानगरपालिकेची निवडणूक सध्या सुरू आहे. या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी आपल हक्क बजावणे आवश्यक आहे. मतदारांमध्ये याबाबत जागृती होण्यासाठी सारडा महाविद्यालयाने पुढाकार घेत घेतलेली रांगोळी स्पर्धा कौतुकास्पद आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रत्येकाने मतदान करावे असा चांगला संदेश दिला आहे, असे गौरवोद्गार महानगरपालिकेचे आयक्त यशवंत डांगे यांनी काढले.

पेमराज सारडा महाविद्यालयात आयोजित रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती या विषयावर रांगोळ्या रेखाटल्या. या रांगोळी प्रदर्शनाची पाहणी आयुक्त यशवंत डांगे यांनी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित सर्व प्राध्यापकांनी, विद्यार्थ्यांनी व युवा मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्याची सामुहिक शपथ घेतली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, अशोक असेरी, प्रा.अपर्णा शेपाळ, राजू रिक्कल व सुजित कुमावत आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, सारडा महाविद्यालय हे उपक्रमशील महाविद्यालय असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध उपक्रम राबवत आहोत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले. आभार प्रा.अपर्णा शेपाळ यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सारडा महाविद्यालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रांगोळी रेखाटून या माध्यमातून मतदान जागृतीचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करण्ऱात आले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. महाविद्यालयातील प्राध्यापकही उपस्थित होते.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात दर्पण दिन

लिंबागणेश । प्रतिनिधी

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दि. ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केलेल्या मराठीतील पहिल्या वृत्तपत्र *''दर्पण''*च्या स्मरणार्थ साजरा होणारा दर्पण दिन आज मंगळवार दि. ०६ जानेवारी रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, मराठा सेवक हनुमान मुळीक आणि तुलसीदास महाराज उपस्थित होते.

कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, ॲड. गणेश वाणी, माजी



उपसरपंच शंकर वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, जीवन मुळे, सुरेश निर्मळ, सचिन आगवान, रवी वायभट, अंकुश गायकवाड, रामचंद्र मुळे, तुकाराम गायकवाड, संजय पावले, मोहन कोटुळे, नवनाथ मुळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन गणपत तागड यांनी केले. यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे म्हणाले, पत्रकार दिन हा केवळ शुभेच्छांचा सोहळा नसून समाजाच्या आरशात उभ्या असलेल्या पत्रकारितेच्या दीर्घ, संघर्षमय व प्रेरणादायी प्रवासाचा मागोवा घेण्याचा दिवस आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्रातून समाजाला दिशा दिली, तसेच 'दिग्दर्शन' मासिकातून सामाजिक प्रबोधन घडवून आणले.

## सीसीटीव्हीच्या आधारे लिंबू टाकणारे दोघे कैद

### अज्ञात टोळ्यांकडून मुला-मुलींना धमक्या; नागरिकांची पोलिसांकडे तातडीच्या कारवाईची मागणी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महापालिका निवडणुकीचा रणसंग्राम सुरू असताना शहरातील वातावरण आधीच तापलेले असतानाच, आता लिंबू-टोना व संशयास्पद हालचालींच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रेल्वे स्टेशन रोडवरील आनंदनगर परिसरात घडलेल्या घटनांमुळे संपूर्ण कॉलनीत खळबळ उडाली आहे. मागील काही दिवसांपासून आनंदनगर परिसरातील विविध ठिकाणी लिंबू आढळून येत असून, यामागे अंधश्रद्धा किंवा जादू-टोना प्रकार असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यासंदर्भात परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले असता, एका दुचाकी वाहनावर एक पुरुष व एक महिला येऊन रस्त्यावर व घरांच्या आसपास लिंबू टाकत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे. हे फुटेज सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, विना क्रमांकाच्या नंबर प्लेटच्या दुचाकीवरून काही युवक परिसरात येऊन नागरिकांना धमकावत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी या प्रकारात वाढ होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यासोबतच, गेल्या १० ते १५ दिवसांपासून रात्री ८ वाजल्यानंतर आनंदनगर व स्टेशन रोड परिसरात ५ ते ६ अज्ञात इसम टोळ्यांच्या स्वरूपात फिरताना दिसत आहेत. हे इसम तोंडाला रुमाल बांधून फिरत असून, लहान मुले व मुलींना धमकावणे, पळवून नेण्याची भीती दाखवणे, तसेच मध्ये कोणी हस्तक्षेप केल्यास जिवे मारण्याची धमकी देत असल्याच्या गंभीर तक्रारी पुढे आल्या आहेत. या सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे आनंदनगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पालक आपल्या मुलांना शाळेत पाठविण्यास घाबरत आहेत. महिलाही सायंकाळी किंवा रात्री घराबाहेर पडण्यास टाळाटाळ करत आहेत. याच परिसरात अलीकडे घरफोडी व लुटमारीच्या घटनाही घडल्याचे समोर आले असून, नागरिकांची असुरक्षितता अधिक वाढली आहे. नागरिकांच्या मते, या सर्व प्रकारांवर तातडीने नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आनंदनगर व स्टेशन रोड परिसरात पोलीस गस्त वाढविणे, संशयित सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दोषींना अटक करणे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## राज्यस्तरीय वंजारी वधु - वर परिचय मेळावा

बीड। प्रतिनिधी

वंजारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाशिक आयोजित वंजारी समाज सर्व सर्व शाखीय भव्य राज्यस्तरीय २२ वा वधु - वर परिचय, पालक व महिला स्नेहसंमेलन मेळावा दि.११ जानेवारी २०२६ रविवार रोजी सकाळी ९.३० वाजता वैभव लक्ष्मी लॉन्स व बॅंक्वेट हॉल, संत जनार्दन स्वामी आश्रम जवळ, छत्रपती संभाजी नगर रोड ,नाशिक येथे संयोजक समितीचे सदस्य दामोदर अण्णा गामणे, देवराम नाना गीते, सौ. चंद्रकलाताई साबळे, नयनाताई आव्हाड, विठ्ठलराव नागरे,वैशाली सांगळे ,जयश्री दराडे ,प्रकाश गीते ,वसंतराव गीते, गणेश हाडपे, गणेश बोडके, रवींद्र आखाडे, अशोकराव येलमाने,संजयजी नाईक ,विठ्ठलराव बोद्रे आदींच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.तरी बीड जिल्ह्यातील वंजारी समाजातील डॉक्टर ,इंजिनियर, वकील, पदवीधर ,शेतकरी, व्यावसायिक, घटस्फोटीत,विदुर, विधवा व अपंग अशा सर्व स्तरातील इच्छुक वधू-वरानी तसेच पालकांनी आपल्या मुला मुलीसह कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवहान वंजारी विश्व-वधू वर नोंदणी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रिकाद्वारे केले आहे.

## घरफोडी करणाऱ्या दोघांना बेड्या

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात घरफोडी करत धुमाकूळ घालणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. या कारवाईमुळे जिल्ह्यातील पाच मोठे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून, पोलिसांनी अटक केलेल्या दोन आरोपींकडून रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मंगेश भुऱ्या भोसले (५०) आणि दिनेश सखाराम काळे (४५, दोघेही, रा. रहाटगाव, ता. पैठण) अशी आरोपींची नावे असल्याची माहिती पोलिस निरीक्षक विजयसिंह राजपूत यांनी सोमवारी (दि.५) दिली. फुलंब्री येथील हरिओम नगरमधील फिर्यादी मज्जीब मन्नान शेख यांच्या तक्रारीवरून फुलंब्री पोलिसांत २६ नोव्हेंबरला घरफोडीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे



शाखेचे पोलिस निरीक्षक विजयसिंग राजपूत आणि त्यांचे पथक करत होते. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांना गुन्ह्यातील संशयित आरोपी गेवराई येथील अलाना कंपनी परिसरात लपलेले असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने गेवराई येथे जाऊन सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. मंगेश भोसले आणि दिनेश काळे दोघांची कसून चौकशी केली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या या आरोपींनी पोलिसी खाक्या दाखवताच फुलंब्रीसह जिल्ह्यातील इतर चार ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली दिली. फुलंब्री, शिवूर, गंगापूर आणि पैठण ठाण्यातील गुन्हे उघडकीस आले. आरोपींकडून चोरीच्या हिश्याला आलेले २५ हजार रोख आणि ३५ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर अधीक्षक अन्नपूर्णासिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विजयसिंग राजपूत, उपनिरीक्षक महेश घुगे, अंमलदार कासीम शेख, प्रमोद पाटील, सचिन राठोड, सुनिल गोरे, बलविरसिंग बहुरे, योगेश तरमळे, जिवन घोलप आणि शिवाजी मगर यांनी केली.

## चुकीच्या उपचारामुळे २०३ दिवसांपासूना महिला व्हेंटिलेटरवर

### पत्नीला वाचवण्यासाठी पतीने घर-दार विकलं

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरमध्ये चुकीच्या वैद्यकीय उपचारांचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका युनानी डॉक्टरने आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन चुकीची ॲलोपॅथी औषधे दिल्यामुळे २८ वर्षीय महिलेची प्रकृती अत्यंत गंभीर झाली आहे.

शहाबाजार परिसरातील अश-शिफा क्लिनिकमधील डॉक्टर मोहम्मद इब्राहिम सौदागर यांच्याविरोधात शहर चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चुकीच्या औषधोपचारांमुळे महिलेच्या चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या असून, ती गेल्या २०३ दिवसांपासून व्हेंटिलेटरवर जीवन-मरणाशी झुंज देत आहे. पीडित महिलेच्या पतीने उपचाराचा खर्च भागवण्यासाठी स्वतःचा प्लॉट आणि वाहने विकून लाखो रुपये खर्च केले आहेत. वैद्यकीय समितीच्या अहवालानंतरच संबंधित डॉक्टरवर ही कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणामुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

दिनांक : ०६-०१-२०२६

**जाहीर प्रगटन**

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक डॉ. दिगंबर विठ्ठल शिंदे हे आहेत.

डॉ. दिगंबर विठ्ठल शिंदे यांचे मालकीची मिळकत गट नं. ९२५, पिंपळनेर, ज्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. १३३० असून त्यांनी सदर मिळकत बालु देवराव निर्धार यांना खरेदीखत क्र. २४३३/२०१८ दि.२७-०६-२०१८ रोजी विक्री कालेली होती व पुन्हा डॉ. दिगंबर विठ्ठल शिंदे यांनी सदरची मिळकत पुन्हा खरेदीखत नं. ४१२६/२०१९ दि.२२-११-२०१९ रोजी केले असून ते सध्या सदर मिळकतीचे मालक आहेत.

मन्यारवाडी ते पिंपळनेर प्रवासा दरम्यान सदर खरेदीखत नं. २४३३/२०१८ दिनांक २७-०६-२०१८ रोजी मुळ पावतीसह गहाळ झाले. त्या बाबत त्यांनी हरवलेल्या मालमत्तेची तक्रार क्र. ०००७/२०२६ दि.०५-०१-२०२६ रोजी पोलीस स्टेशन, पिंपळनेरला नोंदवलेली आहे.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले खरेदीखत नं. २४३३/२०१८ दिनांक २७-०६-२०१८ मुळ पावतीसह ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत पिंपळनेर मालमत्ता क्र. १३३०, लांबी दक्षिण-उत्तर ६६ फुट, रूंदी पुर्व-पश्चिम ३३ फुट, क्षेत्रफळ २१७८ चौ. फुट, म्हणजेच २०२.४१ चौ.मी., गट नं.९२५, पिंपळनेर, ता. जि. बीड, ज्याची चतुःसिमाः-

पुर्वेस : खैसची जमीन, पश्चिमेसः ५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेसः सरकारी रस्ता, उत्तरेस : खैसची उर्वरीत जमीन

मिळकतीचे विद्यमान मालक
डॉ. दिगंबर विठ्ठल शिंदे
रा.मु.पो. पिंपळनेर, ता.जि.बीड
मो.नं. ९९६०९२२९१७

मार्फत
**ॲड.एस. आर. राजपुते**
बुंदेलपुरा, बीड
मो.नं. ९०७५५४५९३२

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज २०००/२०२५**

**मार्फत ॲड. बी बी घुमरे**

**दिलीप तुळशीराम सिरसट व इतर व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : १. दिलीप पि. तुळशीराम सिरसट, वय ५५, वर्षे, धंदा-शेती रा. वडगाव पो. कळसंबर ता. जि. बीड.

२. संपत पि. तुळशीराम सिरसट, वय-५०, वर्षे, धंदा शेती रा. वडगाव पो. कळसंबर ता. जि. बीड.

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत तुळशीराम लक्ष्मण सिरसट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत तुळशीराम लक्ष्मण सिरसट यांचा मृत्यु दिनांक १९.११.२०२४ रोजी वडगाव पो. कळसंबर, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ व २ हे मयताचे मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत तुळशीराम लक्ष्मण सिरसट यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १३ फेब्रुवारी २०२६

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

## सोशल मीडिया पोस्टचा राग; अहिल्यानगरमध्ये तरुणावर प्राणघातक हल्ला

अहिल्यानगर। प्रतिनिधी

सोशल मीडियावर 'समद मेंबर' बाबत पोस्ट टाकल्याच्या रागातून एका तरुणावर शस्त्राने आणि बंदुकीचा धाक दाखवून प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर येथे घडली. या प्रकरणी अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अबरार मुक्तार शेख (वय २३) हे शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून मुकुंदनगर भागातून जात होते. अल अमीन ग्राऊंडसमोर गर्दी असल्याने ते थांबले असता, काही मुलांनी त्यांना अडवले. ''हा तोच मुलगा आहे जो इंस्टाग्रामवर समद मेंबरच्या नावाच्या पोस्ट टाकतो,'' असे म्हणत जमावातील एकाने त्यांना गाडीवरून खाली ओढले. त्यानंतर आरोपी अफजल आसीर शेख (अफजल पैलवान) आणि अस्लम आसीर शेख (अस्लम पैलवान) यांनी तिथे येऊन अबरार यांना मारहाण करण्यास सुरुवात केली.

मारहाणी दरम्यान, अफजल पैलवान याने अबरार यांच्या डोक्याला बंदूक लावून जीवे मारण्याची धमकी दिली, तर अस्लम पैलवान याने धारदार चॉपरने त्यांच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात अबरार गंभीर जखमी झाले असून त्यांच्यासोबत असलेल्या ४ ते ५ अनोळखी मुलांनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. जखमी अबरार यांना उपचारासाठी तातडीने सिव्हिल हॉस्पिटल आणि नंतर पॅसिफिक हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहिता आणि शस्त्र अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. जुन्या वादातून तरुणाला कट्ट्याचा धाक दाखवून मारहाण; सात जणांवर गुन्हा दाखल

शहरातील मुकुंदनगर भागात जुन्या वादातून एका २१ वर्षीय तरुणाला कट्ट्याचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील फिर्यादी यासीर अन्सार सय्यद (वय २१, रा. मुकुंदनगर) हा तरुण परिसरातून जात असताना आरोपींनी त्याला अडवले. ''तू आमच्या विरुद्ध प्रचार करतोस,'' असा बनाव रचून आरोपी समीर उर्फ सगीर जाफर खान, समद वाहब खान, खालीद दिलदार शेख, सोफियान समद खान, माजिद समद खान, मुजीब उर्फ भुऱ्या अजिज खान आणि नावेद रशिद शेख यांनी संगनमत करून फिर्यादीला घेराव घातला. यावेळी आरोपींनी फिर्यादीला कट्ट्याचा धाक दाखवून परिसरात दहशत निर्माण केली. आरोपींनी केवळ धमकावून न थांबता फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याचा ठपकाही आरोपींवर ठेवण्यात आला असून, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक तीव्र केला आहे.

cmyk

# धर्मापुरी शिवारात सात चंदनचोर पकडले

## दोन लाख ६० हजाराच्या चंदनसाठ्यासह ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील धर्मापुरी ते पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूला गायरान जमिनीमध्ये काही लोक चंदनाची बेकायदेशीर खरेदी व विक्री आणि वाहतूक करत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना मिळाल्यावरून या ठिकाणी पोलिसांनी छापा टाकून सात जणांना ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी दोन लाख ६० हजार रुपयांचे चंदनाचे लाकूड तसेच वाहने असा एकूण आठ लाख २१ हजार रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी परळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

अंबाजोगाईचे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांना ५ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. यावरून धर्मापुरी ते पानगाव रस्त्यावर पोलिसांनी रात्री नऊ वाजता छापा



टाकला. यावेळी विनापरवाना चंदनाची तस्करी करताना सात जण सापडले. त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यात पप्पू बाबुराव सूर्यवंशी, राहुल पप्पू सूर्यवंशी, तेजस कलाप्पा काळिंबे, नितीन सटवा जाधव, अविनाश व्यंकट जाधव, व्यंकट रामचंद्र जाधव व भारत निवृत्ती गायकवाड यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी १०४ किलो चंदनाचे लाकूड ज्याची किंमत दोन लाख ६० हजार रुपये ,३९ किलो चंदनाची साल ज्याची किंमत ३९ हजार रुपये, टाटा इंडिको कार ज्याची किंमत तीन लाख रुपये, चार दुचाकी वाहने ज्यांची किंमत एक लाख ६० हजार रुपये, एक विना नंबर दुचाकी ज्याची किंमत वीस हजार रुपये, सात मोबाईल फोन ज्याची अंदाजे किंमत ६१ हजार रुपये, लोखंडी तराजू व वाकस ज्याची किंमत एक हजार रुपये असा एकूण आठ लाख २१ हजार रुपयांचा माल पंचा समक्ष जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिस अमंलदार सतीश कांगणे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम ३०३ (२), ३१७( २ ),३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक असद शेख, पोलीस उपनिरीक्षक निमोणे,पोह. बासर, बिक्कड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील सतीश कांगणे, सहाय्यक फौजदार सोडगीर, पोलिस अंमलदार उत्तरेश्वर केदार, खंदारे यांनी केली.

# आष्टी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी संतोष सानप तर उपाध्यक्षपदी शरद रेडेकर व सचिवपदी विनोद ढोबळे यांचे बिनविरोध निवड



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका पत्रकार संघाची सर्वसाधारण बैठक आज दर्पण दिनी उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली.

या बैठकीत अध्यक्षपदी संतोष सानप, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर, सचिवपदी विनोद ढोबळे, तर कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकार बांधवांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले.

ही निवड प्रक्रिया ज्येष्ठ पत्रकार प्रफुल सहस्त्रबुद्धे, उत्तमराव बोडखे, दत्ता काकडे, सिताराम पोकळे तसेच मावळते अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी संघाच्या वाटचालीचा आढावा घेत पुढील दिशा व धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष सानप यांनी सांगितले की, तालुक्यातील पत्रकारांच्या समस्या, अडचणी, हक्क व सुरक्षिततेसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून ठामपणे आवाज उठवला जाईल. पत्रकारितेतील नीतिमूल्ये जपून सामाजिक बांधिलकीची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी संघ सातत्याने कार्यरत राहील. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपाध्यक्ष मनोज पोकळे व शरद रेडेकर यांनी संघटनेत सर्व पत्रकारांना सोबत घेऊन एकसंघपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सचिव विनोद ढोबळे यांनी संघाच्या कामकाजात पारदर्शकता ठेवून पत्रकारांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन व विविध उपक्रम राबवले जातील, असे स्पष्ट केले. ◀◀ पान ३ वर

# नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी भाजप आक्रमक

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांचे सीओंना निवेदन

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीनंतर बीड शहरातील विविध प्रभागांमधील नागरिकांनी मूलभूत नागरी सुविधांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी व मागण्या केल्या आहेत. त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी मागणी नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.६) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भाजपच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

बीड शहरातील पाणी पुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, आवास



योजना, पार्किंग, महसूल वाढ, तसेच बिंदुसरा नदी सुशोभिकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मागण्या मांडण्यात आल्या. निवेदनात पुढे म्हटले की, प्रामुख्याने नागरिकांना दोन ते तीन दिवसाआड नियमित पाणी पुरवठा कसा करता येईल, याबाबत नियोजन करावे. काडीवडगाव व माजलगाव बॅक वॉटर येथे सोलार सिस्टीम बसवून वीजबिलाचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, काडीवडगाव-ईट बीड पाईपलाईनवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. बिंदुसरा धरणावरून धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. सर्व प्रभागांमध्ये घंटागाड्या नियमित व नियोजनबद्धपणे फिरतात की नाही, यावर नियंत्रण ठेवावे. घंटागाड्यांवर जीपीएस ट्रॅकर बसवून त्या सध्या कोणत्या भागात आहेत, याची माहिती नागरिकांना मिळेल, अशी व्यवस्था करावी. तसेच नवीन घंटागाड्या, कॉम्पॅक्टर व जेसीबी खरेदी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शहरातील छोट्या चौकाचौकात ◀◀ पान ३ वर

# शेतकरी अपघातग्रस्तांसाठी वैद्यकीय सहाय्य निधी नियमांत शिथिलतेची आ.सुरेश धस यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांची मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख डॉ. चैतन्य कागदे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदारसंघातील गंभीर आजारग्रस्त रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळण्याबाबत तसेच निधीसाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेमधील अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



ग्रामीण भागातील शेतकरी शेतीची कामे करत असताना ट्रॅक्टर, मळणी यंत्र, रोटावेटर, कडबा कुट्टी मशीन, ट्रॅक्टर ट्रॉली व इतर शेतीयुक्त अवजारे वापरताना होणाऱ्या अपघातांमध्ये गंभीर जखमी होत आहेत. मात्र अशा अपघातांनंतर उपचारासाठी सध्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळत नसल्याची गंभीर बाब आमदार धस यांनी निदर्शनास आणून दिली. यामुळे अनेक शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी वैद्यकीय सहायता निधीच्या नियमांमध्ये आवश्यक ती शिथिलता देण्याची गरज असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाशी थेट संवाद साधून, शेतकऱ्यांना अपघातानंतर तातडीची व प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.

# कवी अनिलकुमार होळकर यांना सर्वोत्कृष्ट कथा लेखक आणि गीतकार आंतराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

कोलकाता येथील पश्चिम बंगाल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५ मध्ये प्रभातकुमार फिल्मस्? निर्मित आणि कवी अनिलकुमार बा. होळकर दिग्दर्शीत भुरळ डोळ्यांची या मराठी चित्रपटास आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट कथा हा पुरस्कार मिळाला आहे यापूर्वी ही या चित्रपटास आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ट गीत लेखन पुरस्कार प्राप्त झालेला आहे.



भुरळ डोळ्यांचीया सर्वांग सुंदर चित्रपटाच्या गाण्यांना मेलोडी किंग प्रख्यात ज्येष्ठ संगीत दिग्दर्शक अशोक पत्की यांनी संगीत दिलेले आहे तर वैशाली सामंत, बेला शेंडे, ऋषिकेश रानडे, अमृता खोडके आणि मीनाक्षी होळकर यांनी पार्श्वगायन केले आहे.अंबरनाथ येथील स्टार मिराज सिनेमागृहात दादासाहेब फाळके एम.एस.के.ट्रस्ट, मुंबई आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट निर्माता महामंडळ यांनी आयोजित केलेल्या फिल्म फेस्टिवल २०२५ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला.यावेळी चित्रपट क्षेत्रातील जाणकारांनी हा चित्रपट आजच्या काळातील गरज असल्याचे मत व्यक्त केले.नव्वदच्या दशकातील गोडवा चित्रपटातील गाण्यातून पुन्हा परत आल्याच्याही प्रतिक्रिया अनेकांनी दिल्या. या चित्रपटाचे दिग्दर्शनासह कथा - पटकथा - संवाद लेखन, गीत लेखन यासह सहनायकाची भूमिका ही कवी अनिलकुमार बा. होळकर त्यांनी साकारली आहे.प्रसिद्धीपासून दूर राहणारे होळकर हे नव्वदीच्या पिढीतील महत्त्वाचे निसर्ग कवी असल्याचा उल्लेखही त्यांच्या कवितेतील समीक्षेत आढळतो. त्यांची सहा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून त्यांनी कथा, कविता, ललित, नाटक, वगनाट्य, पथनाट्य असे विविध लेखन केले आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पण दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

देशातील पहिले मराठी दैनिक 'दर्पण' ६ जानेवारी रोजी सुरू केले. या निमित्ताने सर्व मराठी पत्रकार दरवर्षी दर्पण दिन साजरा करतात. मराठी पत्रकार परिषद बीड शाखेच्या वतीने दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार जगदिशमामा पिंगळे, प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बीड शहरांमध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला .या निमित्ताने विचाराची देवाण-घेवाण झाली. या कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगरचे सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संपादक संजय मालानी, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख संजय हांगे, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे हल्लाविरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू धरत,तालुका समन्वयक मंगेश निटूरकर, अनिल अष्टपुत्रे, दिलीप शिंगाडे आदींची उपस्थिती होती.

# माजी आ.भीमराव धोंडे यांची सप्ताहास सदिच्छा भेट

शिरूर । प्रतिनिधी

श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीचा सुवर्ण महोत्सव सोहळा मौजे फुलसांगवी येथे मोठ्या थाटामध्ये पार पडत आहे. या सप्ताह सोहळ्याला आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) ज्येष्ठ नेते माजी आ. भीमराव धोंडे यांनी सदिच्छा भेट देऊन श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या प्रति आपली श्रद्धा व्यक्त केली आहे.

'वैराग्याचे महामेरू 'श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे गेल्या चार दिवसापासून हभप.महंत जनार्दन



महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सुवर्ण महोत्सव सोहळा मोठ्या थाटामध्ये पार पडत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या दर्शनासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर आपली उपस्थिती देऊन सप्ताहमध्ये मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात. या सप्ताहात गेल्या चार दिवसात अध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक, क्षेत्रातील मान्यवरांनी ◀◀ पान ३ वर

# महिलांच्या अर्थिक सशक्तीकरणासाठी सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेचा पुढाकार -चेअरमन सुनीता मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून पुढाकार घेऊन शहरातील महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाचा पाया रचला जात आहे. दैनंदिन जीवनात महिलांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावत असल्याचे मत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.सुनीता मोदी यांनी व्यक्त केले. त्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.सुनीता



राजकिशोर मोदी तर प्रमुख अतिथी म्हणून विजया पाटील, मानसी पवार, डॉ.सुनिता तोंडगे, पतसंस्थेच्या सचिव शोभा बाबू खडकभावी, संचालक उषा गणेश मसने, अंजली विष्णुपंत मस्के, सविता विजय रापतवार, संगीता विष्णू सरवदे, परवीन नुजहत फारूखी, सुरेखा बाबुराव खंडाळे, जमुना चोकडा, मोदी ज्वेलर्सच्या संचालिका सरोज मोदी यांच्यासह शाखा व्यवस्थापक सागर कंगळे, कर्मचारी सचिन काशिद, अनिल काळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सुनिता मोदी म्हणाल्या की,

सावित्रीमाई फुले महिला पतसंस्था ही एक महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने स्थापन झालेली संस्था आहे, जी महिलांना आर्थिक मदत पुरवते आणि त्यांच्यात बचत व उद्योजकतेला प्रोत्साहन देते. आपली संस्था ही महिलांच्या आर्थिक विकासात योगदान देत आहे, संस्थेच्या कार्यातून सावित्रीमाई यांच्या विचारांचे आणि समाजसुधारणेचे कार्य पुढे नेले जात असल्याचेही ◀◀ पान ३ वर

# वाहनाची धडक की नियंत्रण सुटले; कुटुंबाचा आधारवड असलेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू

**कडा । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील कडा-लिंबोडी रस्त्यावर सोमवारी दुपारी एका भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अनिल मोहन खिलारे (वय ४५, रा. सांगवी पाटण) असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.**

अनिल खिलारे हे सोमवारी दुपारी कडा शहरातून आपल्या दुचाकीवरून (क्रमांक चक २३ -घ ११३३) गावाकडे निघाले होते. पाचेवस्ती जवळ आले असताना त्यांच्या दुचाकीला भीषण अपघात झाला. हा अपघात एखाद्या अज्ञात वाहनाच्या धडकेने झाला की दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ते कोसळले, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ मात्र, या अपघातात अनिल यांचा जागीच मृत्यू झाला.

जागीच मृत्यू झाला. अनिल मोहन खिलारे (वय ४५, रा. सांगवी पाटण) असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. अनिल खिलारे हे सोमवारी दुपारी कडा शहरातून आपल्या दुचाकीवरून (क्रमांक चक २३ - घ ११३३) गावाकडे निघाले होते. पाचेवस्ती जवळ आले असताना त्यांच्या दुचाकीला भीषण अपघात झाला. हा अपघात एखाद्या अज्ञात वाहनाच्या धडकेने झाला की दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने ते कोसळले, याचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. मात्र, या अपघातात अनिल यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कडा पोलीस चौकीचे पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवासे आणि अमोल नवले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

कुटुंबावर दुःखाचा डोंगर

मयत अनिल खिलारे यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, दोन मुले आणि दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलणाऱ्या अनिल यांच्या अचानक जाण्याने खिलारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# महिला उद्योजकतेचा महाकुंभ! ८० स्टॉल्स, लाखोंची उलाढाल

बीड । प्रतिनिधी

बीडच्या उद्योग क्षेत्रात महिलांनी आता आपली ताकद दाखवून दिली आहे. तेजस्विनी ग्रुपच्या संचालिका सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या कल्पकतेतून आयोजित महिला उद्योजकांच्या भव्य प्रदर्शनाने यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. रामकृष्ण लॉन्स येथे पार पडलेल्या या प्रदर्शनात केवळ गर्दीच झाली नाही, तर लाखोंची उलाढाल होऊन महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा पायंडा रचला गेला.

राज्यातून ७० ते ८० स्टॉल्सचा सहभाग नोंदविले

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे



केवळ स्थानिकच नव्हे, तर पुणे, अकोला, लातूर, संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांतून आलेल्या महिला उद्योजिका! प्रदर्शनात एकूण ७० ते ८० स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये हाताने बनवलेली तोरणे, दागिने, मसाले, मकर संक्रांती विशेष वाण, साड्या ,कपडे, साडी ज्वेलरी, गृह सजावटी चे सामान, ऑरगॅनिक फूड, मशरूम आणि घरगुती खाद्यपदार्थांचा समावेश होता.

कर्तृत्ववानांचा यथोचित सन्मान म्हणून याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सामाजिक भान जपणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. प्रदर्शनादरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक, पत्रकार आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांचा सोनल अरविंदसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या या घटकांना सन्मानित करून तेजस्विनी ग्रुपने एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मोठी खरेदी

येणाऱ्या मकर संक्रांती सणाचे औचित्य साधून महिलांसाठी खरेदीचे हे मोठे दालन उभे करण्यात आले होते. संक्रांतीसाठी लागणारे वाण, तीळ-गूळ आणि इतर गृहोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी बीडमधील तब्बल ५ ते ७ हजार महिलांनी ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जन्मभूमी पोंभुर्ले येथे दर्पण पुरस्कार सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी पत्रकारितेचे आद्य प्रवर्तक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, फलटण यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा 'दर्पण' पुरस्कार पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावर्षीपासून शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील वैशिष्ट्यपूर्ण व प्रभावी लेखन करणाऱ्या अधिकाऱ्याला 'दर्पण' पुरस्काराने सन्मानित करण्याची विशेष बाब महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने घोषित केली होती. या नव्या उपक्रमातील पहिला पुरस्कार पुणे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांना जाहीर करण्यात आला होता. मंगळवारी (दि. ६) हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात जांभेकर पोंभुर्ले-देवळवाडी येथील आचार्य बाळशास्त्री जांभेकर स्मारकातील 'दर्पण सभागृहात' राज्यस्तरीय पत्रकार दिन व 'दर्पण' पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या समारंभात राज्यातील ज्येष्ठ व गुणवंत पत्रकार तसेच पत्रकारितेशी संबंधित विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी पत्रकारितेचे लोकशाहीतील स्थान अधोरेखित केले. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य ती पार पाडते, असे त्यांनी सांगितले. मराठी पत्रकारितेचे आद्य प्रणेते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मभूमीबद्दल कॉलेज जीवनापासून आपल्याला विशेष आकर्षण होते. त्यांच्या नावाचा पुरस्कार त्यांच्या जन्मभूमीत आपल्या हस्ते प्रदान होत असल्याचा विशेष आनंद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच 'दर्पण' पुरस्कार हा पत्रकारितेतील सर्वोच्च सन्मान असल्याचे त्यांनी नमूद केले. याचवेळी प्रा. राम शिंदे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मगावातील स्मारक प्रकल्पासाठी आपल्या स्थानिक विकास निधीतून मदत देण्याची घोषणा केली. ग्रामपंचायत व पत्रकार कल्याण निधीने यासंदर्भात तातडीने पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सूचित केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ यांनी पोंभुर्ले हे गाव महाराष्ट्रातील पत्रकारांची पंढरी व्हावी, या भावनेतून स्मारक उभारण्यात आल्याचे सांगितले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारिता, संशोधन व विद्वत्तेतील कार्य आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास माजी आमदार प्रमोद जठार, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस अधीक्षक मोहन दहिकर, पत्रकार कल्याण निधीचे उपाध्यक्ष कृष्णा शेवडीकर, सरपंच प्रियांका धावडे, सुधाकर जांभेकर यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पुरस्कारप्राप्त पत्रकार, पत्रकार संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सन २०२५ च्या राज्यस्तरीय 'दर्पण' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार राजीव साबडे, नांदेडच्या दै. प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, मसूर (जि. सातारा) येथील 'गुंफण' दिवाळी अंकाचे संपादक बसवेश्वर चेणगे, सातार्यातील ज्येष्ठ पत्रकार जीवनधर चव्हाण, श्रीरामपूरच्या दै. स्नेहप्रकाशचे संपादक प्रकाश कुलथे, अहिल्यानगरच्या दै. नगर टाइम्सचे कार्यकारी संपादक श्रीराम जोशी, यवतमाळच्या दै. सकाळचे अनिल काळबांडे, कोल्हापूर येथील मँगो एफ.एम.चे केंद्रप्रमुख आशिष कदम आणि पुण्याचे जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांचा समावेश होता. सिंधुदुर्गमधील दै. लोकमतचे विजय पालकर यांचा पुरस्कार त्यांच्या पत्नी श्वेता पालकर यांनी स्वीकारला. याचप्रसंगी 'दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर : कर्तृत्वाचा एक शोध' या त्रिखंडात्मक चरित्राचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अमर शेंडे यांनी केले.

## राष्ट्रवादीच्या कार्यालयात तरुणीचा विनयभंग; महात्मा फुलेनगरमधील घटनेने पिंपरीत खळबळ




**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीला उभे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार जितेंद्र ननावरे यांच्या कार्यालयात आलेल्या एका तरुणीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना महात्मा फुलेनगर येथे एक जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी बापलेकावर एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.याप्रकरणी १९ वर्षीय तरुणीने फिर्याद दिली आहे. त्यानुसार सिकंदर पंढरीलाल यादव (वय ३८), पंढरीलाल हंसराज यादव (वय ६०, दोघेही रा.फुलेनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बापलेक गुरूवारी दुपारी कार्यालायत आले. त्यावेळी कार्यालयात आलेल्या एका तरुणीला आरोपींनी शिवीगाळ करण्यास करण्यास सुरुवात केली. त्या तरुणीला अश्लील शिवीगाळ करून विनयभंग केला. याप्रकरणी तरुणीने तक्रार केली असता एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## एका मुलीच्या माध्यमातून 'या' ठिकाणी बोलावलं अन् काटा काढला; अल्पवयीन तरुणाचे अपहरण करुन हत्या

**पुणे । प्रतिनिधी**

१७ वर्षांच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण करून त्याची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना पुणे शहरातून उघडकीस आली आहे. अमरसिंह गचांड (१७) असे खून झालेल्या मुलाचे नाव असून, आरोपींनी इंस्टाग्रामवर एका मुलीच्या माध्यमातून ओळख करून त्याला जाळ्यात ओढल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे.




चार महिन्यापूर्वी अमरसिंह गचांड याने एका व्यक्तीच्या खुनाचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी उत्तमनगर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर अमरसिंह आणि आरोपींमध्ये काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, याच वादातून त्याचा काटा काढण्याचा कट रचण्यात आला. २९ डिसेंबर रोजी अमरसिंह सकाळी घरातून बाहेर पडला. त्यानंतर आरोपींनी एका मुलीच्या माध्यमातून त्याला कात्रज परिसरात बोलावून घेतले. तेथून त्याला खेडशिवापूर परिसरात नेण्यात आले, जिथे आरोपींनी दगड आणि कोयत्याने वार करून त्याचा निर्घृण खून केला. खून केल्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने पाणी अडवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या चारीत मृतदेह पुरून टाकण्यात आला.दरम्यान, अमरसिंह घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्याचा मोबाईल फोन बंद येत होता, तसेच त्याची दुचाकी (ढतड -ललर्शीी) देखील कुठे आढळून आली नाही. २४ तासांनंतर कुटुंबीयांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तपासात त्याचे शेवटचे लोकेशन लोणावळा परिसरात असल्याचे समोर आले. कुटुंबीयांनी संशयितांची नावे व मोबाईल क्रमांक पोलिसांना दिले असून, संबंधित संशयितांचे फोन बंद असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र तरीही संशयितांना तातडीने चौकशीसाठी बोलावले नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणाचा गंभीर आणि सखोल तपास करावा, अशी मागणी त्यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे. या घटनेमुळे पुणे शहरात एकच खळबळ उडाली असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांना ट्रॅप करून गंभीर गुन्हे घडत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## मुक्त विद्यापीठाच्या परीक्षेच्या वेळापत्रकात ऐनवेळी बदल! 'या' ३ दिवसांचे पेपर पुढे ढकलले

**पुणे । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतील १२१ अभ्यासक्रमाच्या हिवाळी परीक्षा ७ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या नियमित विद्यार्थ्यांच्या सत्र, वार्षिक परीक्षा तसेच मे २०२५ च्या सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचीही लेखी परीक्षा राज्यातील २६९ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. परीक्षेसाठी १ लाख ४९ हजार ८७२ विद्यार्थी प्रविष्ट होणार आहेत. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची वर्ग 'क' परीक्षा रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी होणार असून तसेच महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्यामुळे १४ ते १६ जानेवारी २०२६ रोजी नियोजित असलेल्या विद्यापीठाच्या परीक्षांचे आयोजन पुढे ढकलले आहे. मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी नोकरदार, व्यावसायिक, पोलीस, सैनिक, गृहिणी, शिक्षक, कामगार अशा समाजातील विविध घटकांतील असून या परीक्षेमध्ये विविध विषयाच्या ६ लाख ७९ हजार ९५४ उत्तरपत्रिका लिहिल्या जाणार आहेत. परीक्षा सुरळीत व पारदर्शकपणे होण्यासाठी विद्यापीठाने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.



## जुन्नर दुर्गोत्सव : शिवनेरी किल्ल्यावर उत्साहात सुरुवात; ३०० हून अधिक दुर्गप्रेमींचा सहभाग

**ओझर । प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री शिवछत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी किल्ले शिवनेरीवर जुन्नर दुर्गोत्सवाच्या चौथ्या पर्वाला रविवार, ४ जानेवारी रोजी उत्साहात सुरुवात झाली. उद्घाटनाच्या पहिल्याच रविवारी ३०० हून अधिक दुर्गप्रेमींनी सहभाग नोंदवला. हे सहभागी पुणे, मुंबई, अहिल्यानगर, नाशिक, संगमनेर, सातारा, कोल्हापूर, सांगली व श्रीगोंदा येथून आले होते.



सहभागींची सुरक्षितता आणि दुर्गवाचन सर्वांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावे यासाठी पुढील ६ रविवारी गट तीन भागांत विभागून तीन वेगवेगळ्या किल्ल्यांवर कार्यक्रम राबवण्याचा आयोजकांचा निर्णय आहे. हा सात आठवड्यांचा उपक्रम दर रविवारी जुन्नर तालुक्यातील एक ऐतिहासिक किल्ला असा एकूण ७ किल्ल्यांवर संपूर्ण दुर्गवाचन करून राबवण्यात येणार आहे. हा उपक्रम गजांतलक्ष्मी फाउंडेशनच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या जुन्नर टुरिझम हेल्पडेस्क यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून शिवाजी ट्रेल, तालिश रिसॉर्ट, परफेक्ट कृषी मार्केट यार्ड आणि सुझलॉन एनर्जी या मान्यवर शीर्ष प्रायोजकांच्या सहकार्यामुळे हा भव्य उपक्रम शक्य झाला आहे. उद्घाटनाच्या दिवशी शिवनेरी किल्ल्यावर शिवनेरी भूषण विनायक खोत यांच्या नेतृत्वाखाली प्रमीला भोर, अमर गायकवाड, शुभम कडू, मयूर आहेर, सिद्धेश कवडे, प्रभाकर भालचिम, सुशांत पानसरे, धनंजय देसाई, अक्षय काळे, तेजस कामटकर, कोमल मोरे, यश घाडगे, रितेश पानसरे, तुषार वाणी, दत्तात्रय बोडके, कावेरी कबाडी, आदित्य मंचरकर आणि श्लोक कबाडी यांनी उपस्थिती दर्शवली.

## ५० वर्षांचा त्याग, २००० एकर जमीन; पण मालकी हक्क कोणाकडे? उजनी प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला नवी धार

**इंदापूर । प्रतिनिधी**

उजनी धरण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मूळ मालक शेतकर्यांना न्याय मिळावा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या अन्यायाला वाचा फुटावी, या मागणीसाठी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अभिजीत राजेंद्र तांबिले यांनी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन सविस्तर लेखी निवेदन सादर केले.



इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव, कांदलगाव व तरडगाव या गावांमधील शेतकर्यांच्या जमिनी १९७० च्या दशकात उजनी धरण प्रकल्पासाठी माती-मुरूम उचलण्याच्या प्रयोजनासाठी शासनाने संपादित केल्या होत्या. त्या काळात शेतकर्यांनी मोठ्या त्यागातून आपली सुपीक शेती शासनाच्या ताब्यात दिली; मात्र त्यानंतरच्या काळात झालेल्या विविध धोरणात्मक बदलांमुळे व अंमलबजावणीतील त्रुटींमुळे मूळ जमीनमालक शेतकर्यांचे हक्क बाधित झाले असल्याचे तांबिले यांनी निवेदनात नमूद केले आहे.अनेक प्रकल्पग्रस्त शेतकर्यांनी स्वतःच्या खर्चाने पाणीपट्टी भरून जमिनी विकसित केल्या असतानाही आज त्यांना जमिनीच्या मालकी हक्क व वहिवाटीबाबत गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे अनेक कुटुंबांची उपजीविका धोक्यात आली असून हा प्रश्न केवळ कायदेशीर मर्यादित नसून सामाजिक व मानवी दृष्टिकोनातूनही अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.निवेदनात तांबिले यांनी यापूर्वी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकर्यांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक विचार करून वहिवाटीचे आदेश दिल्याचा उल्लेख केला आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत पुन्हा एकदा शेतकर्यांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली असून, याबाबत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी चर्चा करून ठोस व कायमस्वरूपी निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

उजनी प्रकल्पग्रस्त या तीन गावांतील सुमारे २,००० एकर जमिनीच्या मूळ जमीनमालकांचे हक्क अबाधित ठेवावेत, त्यांच्या प्रश्नांचा शासनस्तरावर पुनर्विचार करावा, अशी ठाम मागणी तांबिले यांनी केली आहे. या निवेदनासोबत संबंधित शेतकर्यांच्या सह्यांची यादीही कृषी मंत्र्यांकडे सादर करण्यात आली आहे.दरम्यान, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी या विषयाची गंभीर दखल घेत शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे तांबिले यांनी सांगितले. उजनी प्रकल्पग्रस्त शेतकर्यांना न्याय मिळेपर्यंत हा प्रश्न लावून धरला जाईल, अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## जे झालं ते गंगेला मिळालं, साहेबांचे नेतृत्व दूरदृष्टीचे नेतृत्व, अजित पवारांकडून राष्ट्रवादीतील रेष मिटवण्याचे संकेत

**पुणे । प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या महानापालिका निवडणुकीच्य निम्ताने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहेत. त्यामुळं पुढच्या काळात दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार का? असा प्रश्न पडत आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झुरी) यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे, असे अजित पवार म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळं दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



आम्ही यावेळेस तुतारी आणि घड्याळाला बरोबर घेतलं आहे. आम्हाला वाद घालायचा नाही. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे असे अजित पवार म्हणाले. केंद्राचं आणि राज्याचं राजकारण महापालिकेत आणायचं नाही. तिथलं राजकारण तिथं ते इथं आणायचं नाही असे अजित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका कोण? असा सवाल करत त्या आकाला संपवायचं आहे, असा एल्गार अजित पवार यांनी केला. पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका आपल्याला संपवायचा आहे. त्या आकाला आपल्याला त्याची जागा दाखवायची आहे असे अजित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजीत करण्यात आलेल्या सभेत अजित पवार बोलत होते. अजित पवार यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. २५ वर्षांची आमची कारकिर्द पाहा आणि यांची गेल्या ८ ते ९ वर्षांच्या कारकीर्द पाहा असे अजित पवार म्हणाले. आमच्याकडे सत्ता होती तरी आम्ही सत्तेचा माज येऊ दिला नाही. सत्तेची मस्ती कधी येऊ आम्ही दिली नाही असे अजित पवार म्हणाले अनेक समाजाला आण्ही प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आपल्याला पिंपरी चिंचवड शहराला देशातील पहिल्या क्रमांकावर घेऊन जायचं आहे. त्यासाठी माझ्या विचारांची माणसे विजयी करा असे आवाहन यावेळी अजित पवार म्हणाले.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याने; ३५ नागरिक जखमी; भाजपकडून नगरपरिषदेला थेट इशारा

**चाकण । प्रतिनिधी**

चाकण शहरातील नागरिकांसाठी नववर्षाची सुरुवातच भीतीदायक ठरली आहे. दि. ४ जानेवारी रोजी चाकण शहरात भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात तब्बल ३५ लहान-मोठे नागरिक जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे अनेक कुटुंबांना नव्या वर्षाच्या पहिल्याच आठवड्यात मानसिक आणि आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागले आहे.या गंभीर घटनेस चाकण नगरपरिषदेच्या गलथान, निष्काळजी आणि बेजबाबदार कारभारालाच जबाबदार धरत भारतीय जनता पार्टी,



चाकण मंडलच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले. कुत्रा चाव्यामुळे जखमी झालेल्या सर्व नागरिकांच्या उपचारांचा संपूर्ण खर्च संबंधित ठेकेदार व जबाबदार नगरपरिषद कर्मचार्यांकडून वसूल करण्यात यावा, अशी ठाम मागणी भाजपने केली आहे. भाजप पदाधिकार्यांनी यावेळी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की, नागरिकांच्या जीविताशी खेळणार्या या निष्काळजीपणाला आता माफी नाही.मागण्या तातडीने मान्य न झाल्यास भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. गरज पडल्यास रस्त्यावर उतरून प्रशासनाविरोधात संघर्ष करावा लागेल. या वेळी भाजप चाकण मंडल अध्यक्ष भगवान मेदनकर, सरचिटणीस अजय जगनाडे, संदेश जाधव, प्रदेश उपाध्यक्ष शाम पुसदकर, प्रितम शिंदे, दत्ता परदेशी, योगेश देशमुख, गणपती गौडा पाटील, मंगेश देसाई, नसीम पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.दरम्यान, चाकण शहरात वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे नगरपरिषद वारंवार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस, प्रभावी व कायमस्वरूपी उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

## सख्खा भाऊच पक्का वैरी! काढणीला आलेलं कांद्याचं पीक पेटवून दिलं; शिरूरमधील संतापजनक घटना



**रांजणगाव । प्रतिनिधी**

करंजावणे (ता. शिरूर) येथे शेतातील कांदे जाणूनबुजून पेटवून देऊन नुकसान केल्याचा जाब विचारल्यामुळे सख्ख्या भावाने भावाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी रवींद्र हरिभाऊ कुदळे यांच्या फिर्यादीवरून रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रवींद्र कुदळे यांच्या शेतात कांद्याचे पीक काढणीला आलेले असताना, त्यांचा सख्खा भाऊ चंद्रकांत हरिभाऊ कुदळे आणि वहिनी स्वाती चंद्रकांत कुदळे यांनी हे कांदे जाणूनबुजून पेटवून दिले. यामुळे पिकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या नुकसानीबाबत रवींद्र यांनी विचारणा केली असता, चंद्रकांत आणि त्यांच्या पत्नीने त्यांना मारहाण करून जखमी केले.रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी या घटनेची दखल घेत चंद्रकांत कुदळे व स्वाती कुदळे या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत भाऊच भावाचा वैरी ठरला आहे.

## किकवीत अल्पवयीन मुलावर ब्लेडने वार; भरदिवसा घडलेल्या प्रकाराने खळबळ

**नसरापूर । प्रतिनिधी**

किकवी गावात (ता. भोर) दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी अल्पवयीन मुलाला अडवून धमकी देत मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी राजगड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, किकवी येथील अमृत हरीश्चंद्र आहीरे यांचा मुलगा चैतन्य हा शनिवारी (दि. ३) दुपारी दोनच्या सुमारास खेळण्यासाठी छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवीकडे जात होता.

त्यावेळी पंचशिलनगरकडे जाणाऱ्या पुलावर काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी त्याला अडवले. तोंड शांत नाही ठेवले तर मारून टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर मुलाला हाताने मारहाण करण्यात आली. आरोपींपैकी एकाने ब्लेडने वार करून चैतन्यला दुखापत केली.




शिवीगाळ व दमदाटी करत दोघेही आरोपी घटनास्थळावरून दुचाकीवरून फरार झाले.

या घटनेत चैतन्य जखमी झाला असून त्याच्यावर उपचार करण्यात आले आहेत. भरदिवसा अल्पवयीन मुलावर हल्ला झाल्याने किकवी गावात भीतीसह संतापाची लाट पसरली आहे. दरम्यान, या घटनेचा तपास राजगड पोलीस स्टेशनच्या वतीने सुरू असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके तयार केली आहेत.